cmyk

## संपादकीय

### अमेरिकेपुढे भारताची नांगी

अमेरिकेच्या अध्यक्षांनी सत्तेवर आल्या आल्या आयात करवाढ करण्याचे खूप आधीच घोषित केले होते, त्यानुसार जगातले सगळे प्रमुख देश सावध झाले होते. फक्त ट्रम्प नेमकी काय घोषणा करतात याची वाट पाहात हे देश थांबले होते. त्यानुसार अमेरिकेने आयात करवाढीचा निर्णय जाहीर केल्यानंतर अनेक देशांनी अमेरिकेला जशास तसे उत्तरे दिली, पण भारताचा निर्णय काय असेल हे मात्र गुलदस्त्यातच राहिले. अमेरिकेने घेतलेल्या आयात करवाढीच्या निर्णयाला मोदी सरकार ठामपणे प्रत्युत्तर देणार का, हा कळीचा मुद्दा होता, पण अजून मोदी सरकारकडून यावर कुठलाही प्रतिसाद आलेला दिसला

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### विधेयके राखून ठेवल्याने तामिळनाडूच्या राज्यपालांना फटकारले

दिल्ली: तामिळनाडूच्या राज्यपालांनी राष्ट्रपतींच्या संमतीसाठी १० विधेयके राखून ठेवणे बेकायदेशीर आणि कायद्याने चुकीचे आहे. त्यांनी विधेयकांवर तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा. या काळात त्यांनी विधेयकाला संमती द्यावी किंवा ती विधानसभेला परत करावे किंवा राष्ट्रपतींकडे पाठवावे. राज्यपालांना विधेयके अनिश्चित काळासाठी रोखण्याचा अधिकार नाही. त्यांनी संविधानाच्या कलम २०० मध्ये घालून दिलेल्या चौकटीत काम करावे, अशा शब्दांमध्ये मंगळवारी (दि. ८) सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडूच्या राज्यपालांना फटकारले. राज्य विधानसभेने मंजूर केलेल्या १० विधेयकांना तामिळनाडूचे राज्यपाल आरएन रवी यांनी स्थगिती दिली होती. या निर्णयाविरोधात तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला आणि आर महादेवन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३४४ | बुधवार, दि.०९ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### देशात दबावाचे राजकारण– सचिन पायलट

नवी दिल्ली–२०२५ हे वर्ष पक्ष संघटनेला मजबूत करण्याचे आहे. देशात दबावाचे राजकारण सुरु असून येणाऱ्या समस्यांसंदर्भात आम्ही चर्चा करीत आहोत. जयपूर प्रस्ताव अंमलात आणला जाणार आहे. गुजरातमध्ये काँग्रेसची मुळ खोलवर गेली आहेत असे काँग्रेसचे नेते सचिन पायलट यांनी म्हटले आहे.

### मोसंबीचे दर कोसळले

जालना–तीन आठवड्यापूर्वी मोसंबीचे दर २२ ते २५ हजार रुपये प्रति टन होते, आता १८ हजार रुपये टन भाव मिळत आहे. त्यामुळे मोसंबी उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला असून येणाऱ्या काळात तरी चांगला भाव मिळेल, अशी अपेक्षा त्यांना आहे.

### बीडमध्ये सीईटी परीक्षेत सावळा गोंधळ

बीड: पाच मिनिटे उशीर झाल्याने विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षेला बसू दिले नाही. बीडमधील सीईटी परीक्षेतील सावळा गोंधळ समोर आला असून अनेक विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिले आहेत. बीडच्या नागनाथ सेंटर मधील हा प्रकाण असून पालक आणि विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला आहे.

### राज्यात यंदा विक्रमी कांदा लागवड

नाशिक – राज्यात यंदा विक्रमी कांदा लागवड झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत तब्बल दोन लाख हेक्टर क्षेत्र वधारले आहे. आपत्तीनंतरही दुबार लागवडीवर भर दिल्याचा परिणाम आहे. प्राप्त आकडेवारीनुसार राज्यभरात यंदा तब्बल ६.५१ लाख हेक्टर क्षेत्रावर कांदा लागवड झाली. गतवर्षाच्या तुलनेत एक लाख ८७ हजार हेक्टर क्षेत्राने अधिक आहे.

### साई चरणी ४ कोटीचे दान

शिर्डी : रामनवमी उत्सवाच्या ४ दिवसात साईचरणी भाविकांनी तब्बल ४ कोटी २६ लाखांचे दान दिले आहे. मोठ्या प्रमाणात भाविक दररोज साईबाबांचे दर्शन घेण्यासाठी शिर्डीत येत असतात. राम नवमीच्या काळात मात्र, मोठ्या संख्येनं भाविक शिर्डीत दाखल झाले होते. या काळात भाविकांनी साईचरणी भरभरुन दान दिले आहे. साईबाबा संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांनी याबाबतची माहिती दिली आहे.

### जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

मुंबई : राज्यातील ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. याबाबत अध्यादेश काढण्यासही बैठकीत मंजुरी देण्यात आली.

# शक्तिपीठ महामार्गाच्या मोजणीला विरोध

## बीडचे शेतकरीही आंदोलनाच्या तयारीत, मोजणी न करताच अधिकारी माघारी



### या जिल्ह्यांमधून प्रस्तावीत आहे शक्तीपीठ महामार्ग

सहा पदरी असणारा हा महामार्ग राज्यातील वर्धा,नांदेड, यवतमाळ, परभणी, हिंगोली, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांतून शक्तीपीठ महामार्ग प्रस्तावीत आहे. या महामार्गावर २६ ठिकाणांवर इंटरचेंज असतील तर ४८ मोठे पूल, ३० बोगदे, आठ रेल्वे क्रॉसिंग असा प्रस्ताव आहे.

**बीड । प्रतिनिधी**

**राज्य सरकारचा महत्वकांक्षी प्रकल्प असलेल्या नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्गाला आता बीड जिल्ह्यातही विरोध होताना दिसून येत आहे. बीडच्या अंबाजोगाई आणि परळी तालुक्यातून शक्तिपीठ महामार्ग जाणार असून या ठिकाणचे शेतकरी या महामार्गाविरोधात आक्रमक झालेले दिसून येत आहेत. शक्तिपीठ महामार्गाच्या मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या रोषाचा सामना करावा लागला आहे.**

पिंपळा धायगुडा,भारज,गित्ता या गावात शेतकऱ्यांनी एकत्र येत मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना विरोध केला. कोणत्याही परिस्थितीत आपल्या जमिनी या महामार्गाला न देण्याची भूमिका शेतकऱ्यांनी घेत यावेळी घोषणाबाजी केली. यावेळी महिला शेतकऱ्यांनी देखील आपला सहभाग नोंदवला. शेतकऱ्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना आपली मोजणी सोडून माघारी जावे लागले आहे. राज्य सरकारचा अतिशय महत्वकांक्षी प्रकल्प असलेला पान २ वर

# आषाढीच्या काळात दर्शनासाठी एआयचा होणार वापर

## पंढरपुरात यशस्वी चाचणी; भाविकांची गैरसोय दुर करण्याचा प्रयत्न



**पंढरपूर । प्रतिनिधी**

**आषाढीच्या काळात श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या दर्शनासाठी वर्षाकाठी पंढरपुरात जवळपास दोन ते अडीच कोटी भाविक येत असतात. त्यांचे व्यवस्थापन आता एआयच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. यासंदर्भात पंढरपूर बसस्थानकात यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे. यातून भाविकांची होणारी गैरसोय दुर होण्यास मदत होईल.**

श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या दर्शनासाठी वर्षाकाठी पंढरपुरात जवळपास दोन ते अडीच कोटी भाविक येत असतात. आषाढी यात्राकाळात मानांच्या पालख्यांसह अनेक दिंड्या पायी पंढरपूरला येत असतात. यात्रा काळात भाविकांना सुरक्षित आणि सुलभ पान २ वर

### व्यायाम करताना दिसणार भाविक

पंढरपुर–आषाढी यात्रेत पायी चालत येणाऱ्या लाखो भाविकांसाठी या वर्षी पहिल्यांदाच लठ्ठपणाचे आरोग्य अभियान राबवले जाणार आहे. आरोग्य सल्लागार अर्जुन सुसे पालखी प्रमुखांना भेटून अभियानाची परवानगी घेणार आहेत. पालखी सोहळ्यात रोज पहाटे हरिनामाच्या जयघोषाबरोबर वारकरी व्यायाम करताना दिसणार आहेत.

# मराठवाडा–विदर्भात पावसाची शक्यता

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील काही भागात पावसाला पोषक स्थिती कायम आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही ठिकाणी पावसाचा अंदाज आहे. विदर्भात अमरावती आणि अकोला जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशाराही देण्यात आला. तर जालना, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जळगाव, नंदूरबार, धुळे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यात काही ठिकाणी उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज आहे.**

सोलापूर, परभणी तर लातूर जिल्ह्यात बुधवारी आणि गुरुवारी, धाराशिव जिल्ह्यात बुधवारी आणि गुरुवारी, अमरावती जिल्ह्यात शुक्रवारी, चंद्रपूर जिल्ह्यात गुरुवारी, शुक्रवार आणि शनिवारी पावसाचा अंदाज आहे. तर गडचिरोली, भंडारा, गोंदीया जिल्ह्यात शनिवारी तसेच नागपूर, वर्धा जिल्ह्यात शुक्रवारी तर वाशीम जिल्ह्यात गुरुवारी आणि यवतमाळ जिल्ह्यात गुरुवार आणि शुक्रवारी काही ठिकाणी विजा आणि ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. पान २ वर

## सोमनाथ सुर्यवंशी हत्या प्रकरणी, हायकोर्टाची राज्य सरकारला नोटीस

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

परभणी पोलिसांच्या मारहाणीत न्यायालयीन कोठडीत मृत्यू झालेले सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई विजयाबाई सुर्यवंशी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात राज्य सरकार विरोधात याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर मंगळवारी औरंगाबाद न्यायालयात सुनावणी झाली. त्यावेळी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य सरकारला नोटीस बजावत २९ एप्रिलला पूर्ण उत्तर द्यावे, असे आदेश दिले. सोमनाथ सुर्यवंशी हत्ये प्रकरणी ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी याचिकाकर्त्यांकडून न्यायालयात बाजू मांडली.

परभणीत राज्यघटनेच्या विटंबनेनंतर उसळलेल्या हिंसाचाराच्या प्रकरणात पोलिसांनी सोमनाथ सुर्यवंशी यास चुकीच्या पद्धतीने अटक केली. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या मारहणीत सोमनाथ सुर्यवंशी याचा कोठडीत मृत्यू झाल्यावर मॅजिस्ट्रेटने चौकशी केल्यानंतर पुढे काय करावे? पान २ वर

# घरकुलांसाठी ५ ब्रासपर्यंत वाळू मोफत; राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

८ एप्रिल रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यातील काही निर्णयांबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली आहे. त्यांनी सांगितल्यानुसार आता राज्यभरातील घरकुलांसाठी ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू मिळणार आहे. तसेच सिंधी समाजाला त्यांची घरे आणि व्यावसायिक प्रतिष्ठाने कायदेशीर करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी पान २ वर

### सिंधी विस्थापितांसाठी विशेष धोरण

सिंधी समाजाला घरे आस्थापना अधिकृत करता येतील. १९४७ साली फाळणीत जे विस्थापित झाले, अशा सिंधी समाजाच्या राज्यात ३० वसाहती आहेत. नागपूर, जळगाव, मुंबई येथे या वसाहती आहेत. त्या कायदेशीर नाहीत. या सिंधी विस्थापितांसाठी विशेष धोरण आणले आहे. ज्यावेळी जमीन घेतली, त्यावेळचे रेडी रेकनर दर व १० टक्के इतर कर लावले जातील. या सर्व वसाहती क्लास वनमध्ये बदलण्यात येतील. आम्ही निवडणूक संकल्पनाम्यात हे वचन दिले होते, ते आज पाळले आहे. आजपासून सिंधी समाजाला ही घरे व आस्थापना अधिकृत करता येतील. त्यासाठी सिंधी समाज ज्या दिवशी विस्थापित झाला त्यावेळचा रेडी रेकनर दर, अडीच टक्के कर लावला जाईल, अशी माहितीही बावनकुळे यांनी दिली.

## दिशा सालियन प्रकरण: कोर्टाने थेट वकिलावरच दिले कारवाईचे आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

सेलिब्रेटी मॅनेजर दिशा सालियानचा काही वर्षांपूर्वी बिल्डिंगच्या टेरेसवरून पडून मृत्यू



झाला होता. मात्र तिची हत्या करण्यात आली असल्याचा दावा तिच्या वडिलांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी कोर्टात याचिका देखील दाखल केली. या याचिकेत त्यांनी या प्रकरणाची पुन्हा चौकशी करण्यात यावी, अशी मागणी देखील करण्यात आली. ॲड. निलेश ओझा हे दिशा सालियनची बाजू कोर्टात मांडत असतात. मात्र आता मुंबई हायकोर्टाने ॲड. निलेश ओझा यांना फटकारले आहे. निलेश ओझा यांनी केलेली वक्तव्य चुकीची आहेत असे कोर्टाने त्यांना सुनावले आहे.

कोर्टाचा अवमान केल्याप्रकरणी हायकोर्टात वकील निलेश ओझांविरोधात सुमोटो याचिका दाखल करण्यात आली होती. निलेश ओझा पान २ वर

## पंतप्रधान मोदी मानवाचे अवतार–रामदास आठवले



**बुलढाणा । प्रतिनिधी**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देवाचे अवतार नाहीत, तर मानवाचे अवतार आहेत. अलिकडेच भाजप खासदार तथा अभिनेत्री कंगना रनौत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देवाचा अवतार असल्याचे म्हटले होते. त्यावर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आपली प्रतिक्रिया दिली.**

राज्यमंत्री आठवले मंगळवारी (दि.८) केंद्रीय सामाजिक न्याय विभागाच्या आढावा बैठकीसाठी बुलढाणा दौऱ्यावर पान २ वर

## कुणाल कामरा प्रकरणात हायकोर्टाची मुंबई पोलिसासह आमदारांना नोटीस

**मुंबई । प्रतिनिधी**

स्टँड अप कॉमेडियन कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकमनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गीत म्हटले होते. या प्रकरणी दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करण्याची मागणी कामराने मुंबई उच्च न्यायालयाकडे केली होती. या प्रकरणी न्यायालयाने मंगळवारी (दि.८) मुंबई पोलिस आणि गुन्हा दाखल केलेल्या शिवसेना आमदाराला उत्तर द्या नोटीस बाजवली असून, पुढील सुनावणी १६ एप्रिल रोजी होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकमनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गीत म्हटले होते.



उपमुख्यमंत्री शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा गद्दार असा उल्लेख केला होता. यारून राज्यात वातावरण चांगलेच तापले होते. शिवसेनेचे आमदार मुरजी पटेल यांनी पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०८ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १११.५० क्विंटल | २,३३६ | २,९२० | २,५८६ |
| ज्वारी/हायब्रिड: १९०.०० क्विंटल | १,८०० | ३,७२१ | २,६३१ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ३७.०० क्विंटल | ६,९५० | ७,१२१ | ७,०७६ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १५.०० क्विंटल | २,००० | २,४०० | २,२०० |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ४०.०० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: ४.५० क्विंटल | ५,३०० | ५,५०० | ५,४३३ |

# धक्कादायक! हिंगोली जिल्ह्यात १३ हजार महिलांना कॅन्सर?

## आरोग्य विभाग अलर्ट मोडवर; नागरीकांमध्ये चिंतेचे वातावरण

**हिंगोली । प्रतिनिधी**

**हिंगोली जिल्ह्यात संजीवनी अभियानांतर्गत जिल्हा प्रशासन आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून तीन लाख महिलांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. यामध्ये १३९०० महिला कॅन्सर संशयित असल्याचं आढळून आलं आहे. संशयित महिलांना कोणत्या प्रकारचा कॅन्सर आहे? या संदर्भात पुढील तपासण्या करून त्यांच्यावर योग्य तो उपचार केले जाणार आहेत.**

महिलांमध्ये प्रामुख्याने गर्भपिशवीचा कॅन्सर, स्तनाचा कॅन्सर आणि मुखाचा कॅन्सर हे तीन प्रकारचे कॅन्सर आढळून येतात. त्यानुसार हे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. १३९०० संशयित महिलांच्या लवकरच आता तपासण्या केल्या जाणार असून कॅन्सर



झालेल्या महिलांवर लवकरच उपचार सुद्धा केले जाणार असल्याची माहिती हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिली आहे. जागतिक महिला दिनानिमित्त ही मोहिम राबवण्यात आली असून दारोदारी जावून महिलांची तपासणी करण्यात आली. संभाव्य रुग्णांवर उपचार देखील केले जाणार आहेत. आशा वर्करच्या माध्यमातून डोअर टू डोअर स्क्रिनिंग करण्यात आले होते. प्रश्नावली तयार करून आशा वर्कर्सला ट्रेनिंग देण्यात आले होते. त्यांनी महिलांना प्रश्न विचारून काही लक्षणे आहेत का? याबाबत माहिती जाणून घेतली होती. त्यानुसार १३९०० महिलांची यादी तयार करण्यात आली आहे. तर स्तन आणि गर्भाशयाचा कर्करोग मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील महिलांना होत असल्याचा देखील या तपासण्यामधून स्पष्ट झाल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. दरम्यान, कर्करोग होऊ नये यासाठी सावधगिरी म्हणून एचपीव्हीची लस जिल्ह्यातील सर्व मुली आणि महिलांसाठी देण्याबाबत तालुकास्तरावर शिबिरं आयोजित करावीत. त्यासाठी आठ दिवसात रूपरेषा तयार करा, पान २ वर

### नेमकं उघड झालं कसं?

याबाबत हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल म्हणाले की, जिल्ह्यातील महिलांमध्ये कर्करोगाचे काही लक्षणे असतील तर त्याचे निदान करण्यासाठी आपण ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त संजीवनी अभियान सुरू केले होते. या अभियानांतर्गत तब्बल तीन लाख महिलांची आपण आशा वर्कर्समार्फत सर्वेक्षण केले. सर्वेक्षणानंतर १३९०० महिलांना संबंधित लक्षणे आढळून आली आहेत. त्यामुळे आता १३९०० महिलांच्या तपासण्या केल्या जाणार आहेत.

cmyk

## अग्रलेख

# अमेरिकेपुढे भारताची नांगी

अमेरिकेच्या अध्यक्षांनी सत्तेवर आल्या आल्या आयात करवाढ करण्याचे खूप आधीच घोषित केले होते, त्यानुसार जगातले सगळे प्रमुख देश सावध झाले होते. फक्त ट्रम्प नेमकी काय घोषणा करतात याची वाट पाहात हे देश थांबले होते. त्यानुसार अमेरिकेने आयात करवाढीचा निर्णय जाहीर केल्यानंतर अनेक देशांनी अमेरिकेला जशास तसे उत्तरे दिली, पण भारताचा निर्णय काय असेल हे मात्र गुलदस्त्यातच राहिले. अमेरिकेने घेतलेल्या आयात करवाढीच्या निर्णयाला मोदी सरकार ठामपणे प्रत्युत्तर देणार का, हा कळीचा मुद्दा होता, पण अजून मोदी सरकारकडून यावर कुठलाही प्रतिसाद आलेला दिसला नाही किंवा शेअर बाजारात इतकी प्रचंड पडझड झाल्यानंतरही त्यावर सरकारचा तातडीचा प्रतिसाद किंवा उत्तर ऐकायला मिळालेले नाही.

मोदी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्यापुढे नांगी टाकली आहे, असे अनेक उदाहरणावरून दिसून आले आहे. अमेरिकेत बेकायदेशीर राहणाऱ्या भारतीय नागरिकांची हातापायात बेड्या घालून हकालपट्टी केली गेली, त्यावरही अमेरिकेला चार खडेबोल सुनावले गेले नाहीत. वास्तविक आपल्या देशातील नागरिकांची इतकी अघोरी अवहेलना झाल्यानंतर भारत सरकार संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करेल असे वाटले होते, पण तसे काही झाले नाही. अमेरिकेने केवळ भारतातीलच नव्हे तर अन्य देशातल्या बेकायदेशीर नागरिकांना परत पाठवण्याचा निर्णय घेतल्यानंतर जगातल्या अनेक छोट्या देशांनी ट्रम्प प्रशासनाला कडक इशारा देत त्यांच्या नागरिकांना सन्मानाने मायदेशी आणले. अद्यापही अनेक भारतीय नागरिक अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहत आहेत, त्या नागरिकांच्या बाबतीत किंवा त्यांना परत आणण्याच्या बाबतीतली मोदी सरकारची भूमिका अजून उघड झालेली नाही. त्यातच आता ट्रम्प यांच्या आयात करवाढीचे नवे आव्हान भारतापुढे उभे राहिले आहे. देशातील नागरिकांची आणि गुंतवणूकदारांची त्यामुळे जर भयंकर स्थिती होत असेल तर केंद्र सरकारला तटस्थ राहता येणार नाही. देशहिताच्या दृष्टिकोनातून त्यांना काहीतरी निर्णय घ्यावाच लागेल. अमेरिकेच्या या आयात शुल्काचे भारतावरील विपरीत परिणाम आजच्या दिवसापुरतेच मर्यादित नाहीत. कदाचित आगामी काळ याहीपेक्षा खडतर असू शकतो, त्यामुळे मोदी सरकारला कंबर कसून या सगळ्या परिस्थितीचा सामना करावा लागेल आणि त्याबाबत देशवासीयांपुढे आपली भूमिका अधिक स्पष्ट करावी लागेल. मुळात खूप आधीपासूनच भारतातल्या अर्थकारणाचे तंत्र बिघडले आहे, हे स्पष्ट दिसून आले आहे. त्यात आता भारतीय अर्थव्यवस्थेपुढे हे नवे आव्हान अधिकच कठीण असणार आहे. अर्थव्यवस्था पूर्ण कोलमडून पडेल की काय अशी भीतीही त्यातून निर्माण झाली आहे. आता वक्फ बोर्ड, औरंगजेबाची कबर, संबळची मशीद, समान नागरी कायदा असल्या विषयावर नागरिकांचे लक्ष विचलित करून देशहित साधले जाणार नाही. सरकारला मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील आणि त्याची उकल कशी करणार याची जनतेला माहिती द्यावी लागेल. अर्थात, ट्रम्प यांच्या निर्णयामुळे केवळ भारताचीच नव्हे तर जगातल्या अनेक प्रमुख देशांची कोंडी झाली आहे. मात्र, त्या त्या देशांनी त्याला प्रतिसाद देण्याची जय्यत तयारी सुरू केली आहे. मुळात ट्रम्प यांच्या निर्णयावर त्यांच्या देशातली जनताच खूश नाही. लाखोच्या संख्येने लोक ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिकेच्या रस्त्यांवर उतरले आहेत, पण त्यामुळे ट्रम्प माघारी फिरतील अशी शक्यता फार कमी आहे. सणकी नेतृत्व हे सगळ्यांना तापदायक असते. अशा सणकी नेतृत्वाला ताळ्यावर आणण्याची ताकद देशातल्या जनतेमध्ये असते. अमेरिकेची जनता ट्रम्प यांना वठणीवर आणेल एवढीच आशा आपण बाळगू शकतो. अन्यथा आगामी काळ भारतासाठी तरी भीषणच आहे. आजच्या घडीला भारताने ट्रम्प प्रशासनाच्या विरोधात चीनसारखी किंवा कोलंबियासारखी ठाम आणि जशास तशी भूमिका घेणे गरजेचे आहे असे अनेक विदेश नीती तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पण केवळ गौतम अदानी यांना वाचवण्यासाठी मोदी अमेरिकेपुढे नमती भूमिका घेत आहेत, असा आरोप सातत्याने झालेला आहे. गौतम अदानी यांच्या विरोधात अमेरिकेमध्ये करचुकवेगिरीच्या आरोपाखाली खटला सुरू असून त्यातून अदानी यांना अमेरिकेच्या हवाली करावे लागेल काय अशी एक शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळेच मोदी सरकार अमेरिकेपुढे नमती भूमिका घेत आहे, असे सांगितले जात आहे. याबाबतही मोदी सरकारला नेमके स्पष्टीकरण द्यावे लागेल. गौतम अदानी यांच्यापेक्षा देश आणि देशातील गुंतवणूकदारांची सुरक्षितता याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.

# सलोखा योजनेमध्ये मुदतवाढ

**जालना । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ नोंदणी अधिनियम, १९०८. सलोखा योजनेमध्ये महाराष्ट्र शासनाकडून मुदतवाढ देण्यात आली.**

महाराष्ट्रामध्ये किंबहुना देशामध्ये जमिनीच्या वादाबाबतची कोट्यवधी प्रकरणे विविध न्यायालयांमध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. त्यामध्ये मुख्यत मालकी हक्काबाबतचे वाद, शेत बांधावरुन होणारे वाद, जमिनीच्या ताब्याबाबतचे वाद, रस्त्याचे वाद, शेत जमीन मोजणीवरुन होणारे वाद, अधिकार अभिलेखातील चुकीच्या नोंदीमुळे होणारे वाद, शेतीवरील अतिक्रमणावरुन होणारे वाद, शेती वहीवाटीचे वाद, भावा-भावांतील वाटणीचे वाद, शासकिय योजेनेतील त्रुटी किंवा प्रस्ताव अमान्यतेबाबतचे वाद इत्यादी कारणांमुळे शेतजमीनीचे वाद समाजामध्ये आहेत. शेतजमिनीचे वाद हे अत्यंत क्लिष्ट स्वरूपाचे व गुंतागुंतीचे असल्याने न्यायालयातील व प्रशासनातील पुरेशा यंत्रणेअभावी सदर वाद वर्षानुवर्षे चालू आहेत. शेतजमिन हा प्रत्येकाचा जिव्हाळ्याचा व संवेदनशिल विषय असल्यामुळे त्यातील वादांमुळे कौटुंबिक नात्यांमध्ये एकमेकांबद्दल असंतोषाची भावना व दुरावा निर्माण झाला आहे. सदर वादांमुळे अनेक पिढ्यांचे नुकसान झाले असून, आजच्या पिढीचाही खर्च व वेळेचा अपव्यय होत असून अशा प्रकारचे वाद संपुष्टात येण्यामध्ये म्हणावी अशी प्रगती झालेली दिसत नाही. शासनाने शेतजमिनीचा ताबा व मालकीबाबत शेतकऱ्यांतील आपआपसांतील वाद मिटविण्यासाठी व समाजामध्ये सलोखा निर्माण होऊन एकमेकांमधील सौख्य व सौहार्द वाढीस लागण्यासाठी एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतक-याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमिन धारकांचे अदलाबदल दस्तांसाठी मुद्रांक शुल्क नाममात्र रु.१०००/- व नोंदणी फी नाममात्र रु. १०००/- आकारून मुद्रांक शुल्क व नोंदणी फी मध्ये सवलत देण्याची "सलोखा योजना" राबविण्यास . शासन निर्णय झालेला आहे. निर्णयामध्ये सदर योजनेचा कालावधी अदलाबदल दस्तासाठी नोंदणी फी व मुद्रांक शुल्कामध्ये सवलत देण्याबाबतची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाचा राहील असे नमुद केले आहे. त्यानुसार सदर योजनेची मुदत दिनांक ०२.०१.२०२५ रोजी संपुष्टात येत आहे. सदर योजनेस आणखी एक वर्षाची मदत वाढ देण्यात आली आहे शेतजमिनीचा ताबा व वहिवाटीबाबत शेतकऱ्यांतील आपआपसांतील वाद मिटविण्यासाठी व समाजामध्ये सलोखा निर्माण होऊन एकमेकांमध"सलोखा योजनेचा कालावधी दि.०२.०१.२०२५ पासून दि.०१.०१.२०२७ पर्यंत वाढविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने, सुनिल जाधव कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# जगा आणि जगू द्या भ.महाविरांचे मुळ मंत्र-हस्तीमल बंब

**जालना । प्रतिनिधी**

त्याग, तपस्या, सत्य, अहिंसाचे पुजारी भगवान महाविरांचे जन्मकल्याणक च्या निमित्ताने महावीर इंटरनॅशनल जालना सेंटर रॉयलच्या वतीने ८ अप्रैल २०२५ रोजी जिल्हा सरकारी महिला रुग्णालय येथे १३२ रुग्णांना फळे, बिस्किट इ. वाटप करण्यात आले.त्याप्रसंगी महाराष्ट्र व गुजरात राज्याचे प्रभारी हस्तीमलजी बंब म्हणाले स्वतः साठी, आपल्या कुटूंबासाठी कोणी ही करतात, पण दिनदुःखी, अपंग, विकलांग, गरजुंसाठी व रुग्णांसाठी मदत आणि सहाय्य करणे हे महान कार्य आहे. दान-धर्म, पुजा-पाठ, मंदिरात जे पुण्य मिळते, या विधायक कामात त्यापेक्षा कमी पुण्य मिळणार नाही. गरजुं आपल्या पर्यंत पोहचण्यापेक्षा आपण त्यांच्या पर्यंत पोहचवून सहाय्य केले पाहिजे. भगवान महावीरांनी संपुर्ण विश्वाला अहिंसा व शांतिचा संदेश दिला आहे. जगा आणि जगू द्या हेच भगवान महावीरांचे मुळ मंत्र आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा आहे. या वर्षी आपल्या सरकार ने भगवान महावीर जन्मकल्याणकला ला



शासकीय मान्यता दिली आहे. शासना तर्फे सुध्दा महावीर जन्मकल्याणक साजरा करण्यात येत आहे, हे आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. सकल जैन समाजा तर्फे धार्मिक, सामाजिक सेवा कार्य, प्रश्नमंच स्पर्धा, रॅली, देखावे, मंदिरात अभिषेक याच श्रृंखला मध्ये महिला रुग्णालयात फळे, बिस्कीट इ. वाटप करण्यात आले आहे, असे बंब म्हणाले. अध्यक्ष विजयराज सुराणा म्हणाले महावीर इंटरनॅशनल संस्था मागील ५० वर्षापासून दिनदुःखी, गोर-गरीब, गरजुंसाठी सेवा कार्य करीत आहे. हेच संस्थेचे मुख्य उद्देश्य आहे. भगवान महावीरांचे विचार जोपासणारे कोणत्याही धर्माचे व्यक्ती आमचे सभासद होऊ शकतात. जालना शाखेला उत्कृष्ठ सेवा कार्या बद्दल मागील दिवसात राज्यस्तरीय पुरस्कार सुध्दा मिळालेला आहे. यात सर्वाचे योगदान व कष्ट राहिलेला आहे, असे सुराणा म्हणाले. या कार्यक्रमासाठी नरेन्द्र मोदी, अभय सेठिया, कचरुलाल पाटणी, पार्श्वनाथ अंबेकर, दिनेश राका, सुदर्शन चिप्पा, सुभाष सोनवणे इ. यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार देवेन्द्र सावजी यांनी मांडले.

# आयुक्त मनोहरे यांच्या प्रकृतीत सुधारणा

**लातूर । प्रतिनिधी**

**लातूर महापालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दि. ५ मार्च रोजी रात्री उशिरा स्वत:च्या डोक्यात गोळी झाडून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेला ७२ तासाहून अधिकाचा काळ उलटला असून आता त्यांयावर मुंबईतील कोकीळाबेन हॉस्पीटलमध्ये उपचार सुरु असून ते उपचाराला लातूरच्या सह्याद्री रुग्णालयाप्रमाणेच प्रतिसाद देत आहेत. मंळवारी त्यांच्या विविध तपासण्या करण्यात आल्या असून त्याचे सर्व आरोग्य तपासणी अहवाल उत्तम असे आले आहेत. त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आल्याने आता त्यांची तब्येत स्थिर आहे. मात्र, आता पुढील उपचारासाठी लातूर येथील हॉस्पिटल ते विमानतळ येथे ग्रीन कॉरिडर करण्यात आला होता. त्यानंतर एअर ऍम्बुलन्सद्वारे त्यांना मुंबईला हलविण्यात आले.**

महापालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी शनिवारी रात्री उशिरा स्वत:च्या डोक्यात गोळी झाडून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. घटनेनंतर त्यांना तात्काळ लातूरातील सह्याद्री हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते येथे यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र मेंदूच्या काही भागात संवेदना कमी असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी मुंबई येथील कोकिळा बेन हॉस्पिटल येथे सोमवारी (७ एप्रिलला) साडेदहा ते अकराच्या दरम्यान एअर ऍम्बुलन्सद्वारे लातूर विमानतळावरुन मुंबईकडे नेण्यात आले. तेथे ही ते लातूर प्रमाणेच उपचाराला प्रतिसाद देत असून मंगळवारी त्यांचा सीटी स्कॅन, एमआरआय, व्हेनोग्राफी, अँजोग्राफी आदी तपासण्या करण्यात आल्या असूनत्याचे सर्व आरोग्य तपासणी अहवाल उत्तम असे आले आहेत. त्याच्या मेंदूच्या काही भागात संवेदना कमी असल्याने डाव्या बाजूच्या अवयवयांची हालचाल कमी होत असली तरी त्याच्या उजव्या बाजूचे अवयव पुर्वृत पणेच हालचाल करीत आहेत. त्यांच्यावर लातूरातील सह्याद्री हॉस्पीटल मध्ये जी ट्रीटमंट सुरू होती तीच सेम ट्रिटमेंट कोकीळाबेन हॉस्पीटल मध्ये सुरू असून ते लवकरच बरे होतील असे त्यांच्यावर उपचार करणा-या वैद्यकीय तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

# संत ज्ञानेश्वर नगर येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळा उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

**बीड मधील संत ज्ञानेश्वर नगर मधील दक्षिण मुखी हनुमान मंदिर मध्ये दिनांक ६/४/२०२५ वार रविवार रोजी प्रभू श्रीराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला.**

यावेळी रंगीबेरंगी फुलांचा आकर्षक पाळणा आणि फटाक्याच्या आतिषबाजीत व तोफेच्या आवाजात मंदीरात दुपारी श्रीरामाचा जयघोष झाला अन्? 'राम जन्मला गं सखी, राम जन्मला', 'सियावर रामचंद्र की जय...प्रभू रामचंद्र भगवान की जय... अशा जयघोषांनी मंदीराचा परिसर दुमदुमून गेला. मंदीराच्या वतीने भजनाचा कार्यक्रम झाला.विशेष म्हणजे श्रीरामाच्या जीवन चरित्रावरील सरस भजने सादर झाली नंतर पूजा करण्यात आली. जन्मोत्सवानिमित्त श्रीरामाची मूर्ती,गाभारा,



सभामंडप आणि मंदिराचा परिसर फुलांनी सजविण्यात आला होता. रामजन्म सोहळ्यानंतर श्रीरामाच्या दर्शनासाठी महिला,पुरुष भक्तांची मोठी गर्दी झाली होती. मंदिरात रामनवमीच्या निमित्ताने बीड मधील दैनिक पार्श्वभूमी चे चिंचोलकर उपसंपादक, दैनिक अक्षरवार्ता चे संपादक संजय हांगे, दैनिक लोकाशा चे उपसंपादक आभिजित नखाते व दैनिक बीड टाइम्स चे संपादक कमलाकर कुलथे हे देखील रामनवमी च्या कार्यक्रमाला हजर झाले होते.त्यावेळी मंदिर कमिटी तर्फे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमानंतर मंदीराच्या वतीने सर्व भाविकांना विशेष महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील कार्यक्रम यशस्वी करणेसाठी हनुमान सेवक तथा दक्षिण मुखी हनुमान मंदिर कमिटीचे अध्यक्ष जगन्नाथ यमपुरे, कारभारी सानप, बाबसाहेब गर्कळ, वचीष्ट जोगदंड, आर्जुन गर्कळ, तानाजी महाजन, आशोक शेळके, श्याम देवडकर, सातपुते सर, नागनाथ कागदे, विनायक सिरसट सर, विजय आगलावे, सोनलाल जानवळे, नानाभाउ कैतके, सत्यकुमार मोरे, मसु कदम, सुधाकर नखाते, जोगदंड जिजा (माजी पिएसआय), डॉ. सावंत, नामदेव डोंगरे, सर्जेराव उगलमुगले, विठ्ठल काटवटे, मच्छिंद्र पवार सर, जालीदर सुर्वे, पांडुरंग भैरट, कचरु चव्हाण, रावसाहेब शेळके, भास्कर वारे, श्रीकीशन वाघमारे सर, राम बोबडे, गहीनीनथ घोरड, गंगाधर आगरकर यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

# आरक्षण वर्गीकरण अंमलबजावणीसाठी मोर्चा

**परतुर । प्रतिनिधी**

**मातंग समाजासाठी न्याय हक्क मिळण्याकरता परतूर शहरात मातंग समाजाच्या वतीने मोर्चा काढण्यात आला यावेळी उपजिल्हाधिकारी यांना मुलींच्या वतीने निवेदन देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अनुसूचित जाती प्रवर्गात आरक्षण वर्गीकरण लागू करणे आणि मातंग समाजावर होत असलेल्या अन्याय अत्याचारा विरोधात मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी झाले होते.**

प्रामुख्याने मोर्च्यात अनुसूचित जाती प्रवर्गात आरक्षण वर्गीकरण झालेच पाहिजे आणि आरोपीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे या मागणीच्या पाट्या हातात घेत नागरिकांनी उत्सूर्फपने घोषणा दिल्या.क्रांतीगुरू लहुजी साळवे चौक ते उपजिल्हाधिकारी कार्यालय या मार्गे शिस्तबद्धतेने मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. दरम्यान उपजिल्हाधिकारी यांना कुमारी माहेश्वरी आव्हाड,अश्विनी हिवाळे, रूपाली हिवाळे,आरती साबळे या मुलींच्या वतीने निवेदन देण्यात आले. व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते गणपत भिसे,ॲड.विलास साबळे,ॲड राम चव्हाण, मारुती वाडेकर,राजू कसबे,संजूबाबा गायकवाड,भास्कर शिंदे,शिवाजी कांबळे,संतोष तुपसौंदर्य, रविकांत जगधने,शिवराज जाधव,रंगनाथ गजले, सुरेश साळवे,रवी पाखरे किसन लांडगे,गुलाब साठे,नामदेव साळवे यांची उपस्थिती होती. आयोजित मोर्च्यात १ ऑगस्ट २०२४ रोजीच्या सर्वोच्च न्यायालय निर्णयाच्या अनुषंगाने १५ ऑक्टोंबर २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णया नुसार महाराष्ट्र शासनाने राज्यात तात्काळ आरक्षण वर्गीकरण विधेयक मंजूर करून येत्या जुन महिन्या पासून आरक्षण वर्गीकरणाची आमलबजावणी करून अनुसूचित जातीतील अतीवंचित जातींना



संविधानिक समतेचा सामाजिक न्याय मिळवून द्यावा.याबाबतची मागणी व्यासपीठावरील मान्यवरानी केली. तसेच दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी परभणी येथील अतीवंचित असणाऱ्या मातंग समजातील निष्पाप अल्पवयीन बालीकेवर निराधमानी केलेला अत्याचार प्रकार अत्यंत घृणास्पद आणि निंदनीय आहे.याबाबत आरोपीला फाशीची शिक्षा होण्यासाठी विशेष चौकशी पथक स्थापन करून सदर खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात यावा आणि नराधम आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे आणि या प्रकरणातील अधिकच्या आरोपींवर कायदेशीर कडक कार्यवाही करावी. आणि महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जातीतील अतीवंचित असणाऱ्या मातंग समाजावर दैंनदिन सातत्याने घडत असलेले अन्याय अत्याचार मालिका ही अत्यंत दुर्दैवी बाब असून याबाबत महाराष्ट्र सरकारने प्रत्येक घटनेतील गुन्ह्यात विशेष चौकशी पथक स्थापन करून दोषी आरोपींवर कायदेशीर कडक शासन करावे आणि मातंग समाजाला तात्काळ न्याय मिळवून द्यावा. याबाबत मोर्च्यातची मागणी करण्यात आली.

## पान १ वरून...

### शक्तिपीठ महामार्गाच्या

शक्तिपीठ महामार्ग हा कोणत्याही परिस्थितीत करायचा असा निर्धार सरकारकडून व्यक्त केला जात आहे. असे असले तरी नागपूर ते गोवा जाणाऱ्या या महामार्गाला राज्यभरातील अनेक ठिकाणी शेतकऱ्यांकडून विरोध होताना दिसत आहे. कोल्हापूरमध्ये अत्यंत आक्रमक पद्धतीने शक्तीपीठला विरोध होत आहे. अशातच आता या विरोधाची धग बीड जिल्ह्यापर्यंत पोहचली आहे. पिंपळा धायगुडा,भारज,गित्ता या गावात महामार्गाचा मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी घोषणा देत विरोध केला. शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा बघून अखेर अधिकाऱ्यांना आल्या पावली माघारी जावे लागले. यावेळी शेतकऱ्यांनी कोणत्याही परिस्थितीत जमीन न देण्याचा निर्णय बोलून दाखविला.

------------

### मराठवाडा-विदर्भात

तर दुसरीकडे दोन दिवसात विदर्भात उन्हाचा चटका चांगलाच वाढला होता. अकोला येथे राज्यातील सर्वाधिक ४४.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. ब्रम्हपुरी येथे ४३.८ अंश, चंद्रपूर आणि अमरावतीत ४३.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. नागपूर, वर्धा, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यातही ४२ अंशापेक्षा अधिक तापमान होते. राज्यातील इतर भागातही तापमान ४१ अंशाच्या दरम्यान पोहचले आहे.

-----------

### आषाढीच्या काळात दर्शनासाठी

दर्शन मिळावे, कुठेही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी प्रशासनाकडून एक महिना अगोदरच तयारी केली जाते. पंढरपूरमध्ये आषाढी यात्रा कालावधीत शहरात प्रामुख्याने चंद्रभागा वाळवंट, नदीपात्र, भक्ती सागर परिसर, मंदिर परिसर, दर्शन रांग, प्रदक्षिणा मार्ग, शहरातील रस्ते या भागात हजारो वारकरी-भाविकांची गर्दी होते. या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय तंत्रज्ञानाचा वापर होणार आहे. एआय तंत्रज्ञान वापराबाबतची चाचणी मंगळवारी पंढरपूर बसस्थानक येथून घेण्यात आली. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, प्रशिक्षित आय.पी.एस अधिकारी अंजना कृष्णन, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, विक्रांत गायकवाड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, ड्रोन आयडीया फोर्चचे एजीएम आशिष माथूर उपस्थित होते. प्रत्येक वर्षी होणाऱ्या सोहळ्यात गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ए. आय तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. या माध्यमातून सुरक्षित गर्दी व्यवस्थापन ही संकल्पना राबवली जाणार आहे. या तंत्रज्ञानाव्दारे गर्दीचे प्रमाण, गर्दीची घनता मोजता येणार आहे.चेहऱ्याची ओळखी द्वारे हरवलेली अथवा मदतीची गरज असलेले लोकांची माहिती, ऑब्जेक्ट शोधणे त्यांच्या हालचालींचे विश्लेषण देखील करता येईल. गर्दीची वाढलेली घनता लक्षात येताच तत्काळ सूचना मिळेल व त्या ठिकाणी सुरक्षेबाबत उपाययोजना राबवता येतील. वारी कालावधीतील गर्दीच्या व्यवस्थापनाबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या एक वर्षापासून प्रशासनातील अधिकारी एआय तंत्रज्ञानाच्या वापराबाबत संशोधन करीत होते. त्याबाबतची चाचणी आज घेण्यात आली. एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुरक्षित गर्दी व्यवस्थापन ही संकल्पना राबवली जाणार असून, एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने गर्दी मोजणे, व्यवस्थापन करणे सोपे होणार असल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी सांगितले.

-------------

### घरकुलांसाठी ५ ब्रासपर्यंत

सांगितले आहे. ते मंगळवारी मुंबईत माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. राज्यातील घरकुलांना आपण पाच ब्रास मोफत वाळू देणार आहोत. प्रत्येक वाळूघाटात १० टक्के आरक्षण हे घरकुलांसाठी असेल. ज्या ठिकाणी पर्यावरण मंजुरी नाही, त्या ठिकाणी स्थानिक ग्रामपंचायती यांनीही पुढची कारवाई करायची आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले आहे. तसेच, नैसर्गिक वाळू देण्याचे धोरण पुढच्या कॅबिनेटमध्ये आणणार आहोत. एम सँड म्हणजे कृत्रिम वाळू तयार करण्यात येईल. सरकारी बांधकामात एम सँड वाळूच वापरली जाईल. नदीच्या वाळूची गरज पडणार नाही. एम सँड धोरण पुढच्या कॅबिनेटमध्ये आणले जाईल. दगड आणि गिट्टीपासून ही वाळू तयार केली जाणार आहे, अशी माहितीही चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

-----------

### कुणाल कामरा प्रकरणात हायकोर्टाची

दिलेल्या फिर्यादीनुसार कामराविरोधात गुन्हा दाखल झाला होता. कामराने न्यायालयाकडे गुन्हा रद्द करण्याची मागणी केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि एस.एम. मोडक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. पोलिस आणि तक्रारदार आमदार पटेल यांना सूचना घेऊन याचिकेवर उत्तर देण्याचे निर्देश खंडपीठाने दिले. या प्रकरणात पुढील सुनावणी आता बुधवार १६ एप्रिल २०२५ रोजी होणार असल्याचे न्यायालयाने निश्चित केले आहे.

----------------

### सोमनाथ सुर्यवंशी हत्या प्रकरणी,

याविषयी कायदा अपूर्ण आहे. त्यामुळे न्यायालयाने या प्रकरणात नियमावली तयार करावी, अशी मागणी ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे केली. उच्च न्यायालयातील सुनावणीवेळी सोमनाथ सुर्यवंशी प्रकरणी एसआयटी नेमण्याची मागणीही करत ही एसआयटी न्यायालयाने नेमावी आणि कोर्टाच्या अधिपत्याखाली ती चालविण्यात यावी अशी मागणीही केली. तसेच सोमनाथ सुर्यवंशी प्रकरणात आरोपी हे राज्य सरकार आहे. त्यामुळे या प्रकरणात आरोपी असलेले राज्य सरकार त्याच प्रकरणाचा तपास कसा करू शकते?, असा युक्तिवादही प्रकाश आंबेडकर यांनी केला. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, बदलापूर प्रकरण आणि परभणी प्रकरण एक सारखे आहे. बदलापुर प्रकरणी तपास न्यायालयाच्या देखरेखीखाली सुरू आहे, याही प्रकरणात तपास न्यायालयाच्या देखरेखीखाली व्हावा, अशी मागणी करत मध्यंतरी सीआयडीने सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांची भेट घेत चौकशी केली होती, त्याविषयी बोलताना ॲड. आंबेडकर म्हणाले की, पुढच्या सुनावणीच्या वेळी सीआयडीलाला आरोपी करू असेही ते म्हणाले.

-----------

### दिशा सालियन प्रकरण: कोर्टाने थेट

यांनी रेवती मोहिते डेरे यांच्यावर आरोप केले होते. हे गंभीर आरोप होते. याप्रकरणी मुंबई हायकोर्टात सुनावणी पार पडली. या सुनावणीवेळी मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश आणि अन्य ४ न्यायाधिशांच्या एकत्रित बेंचने यावर सुनावणी केली. त्यासोबतच ५ न्यायाधीशांसमोर हायकोर्टात सुनावणी पार पडली. यावेळी हायकोर्टात निलेश ओझा यांचा एक बाईट ऐकवण्यात आला. पाच न्यायाधीशांनी हा बाईट ऐकला. या बाईटमध्ये क्लोजर रिपोर्टबद्दल निलेश ओझा हे वक्तव्य करत होते. या पत्रकार परिषदेत निलेश ओझा यांनी न्यायाधीश रेवती मोहिते डेरे यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यांनी केलेल्या या वक्तव्याने ते वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. याच वक्तव्याने न्यायालयाचा अवमान झाल्याने हायकोर्टाने सुमोटो घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. यावेळी कोर्टाने निलेश ओझा यांना चांगलेच सुनावले आहे. कोर्टवर असे आरोप करणे, न्यायाधीशांवर आरोप करणे म्हणजे न्यायव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करण्यासारखे आहे. निलेश ओझा यांनी केलेली वक्तव्य कोर्टाचा अवमान करणारी आहेत. त्यांनी केलेली वक्तव्य ही चुकीची असून यावर कोर्ट असमाधानी आहे. निलेश ओझा यांच्यावर संबंधित कारवाईचे आदेश आम्ही जारी करत आहोत, असे कोर्टाने म्हंटले आहे.

---------------

### धक्कादायक! हिंगोली जिल्ह्यात

अशा सूचना पालकमंत्री डॉक्टर उदय सामंत यांनी जिल्हा शल्य चिकित्सक तालुका आरोग्य अधिकारी यांना दिल्या आहेत.

-------------

### पंतप्रधान मोदी मानवाचे

आले होते. सायंकाळी स्थानिक विश्राम भवनावर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, मी मोदी यांना देवाचा अवतार मानत नाही, ते मानवाचा अवतार आहेत. पंतप्रधान मोदी हे जगातील प्रभावशाली नेते असून लोकप्रियतेच्या बाबतीत दिवंगत पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम ते मोडून काढतील, असा विश्वास मंत्री आठवले यांनी यावेळी व्यक्त केला.

-------------

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. ९ एप्रिल २०२५





## शौर्य धाबेकर याचा सत्कार

कळंब । प्रतिनिधी

नवोदय परीक्षेत यश संपादन केलेल्या शौर्य सुहास धाबेकर या विद्यार्थ्यांचा पुस्तक व पेन देऊन केला सत्कार. सतीश टोणगे माजी नगरसेवक तथा पत्रकार संघाचे अध्यक्ष यांनी शौर्य सुहास धाबेकर हा विद्यार्थी जवाहर नवोदय प्रवेश परीक्षेत यश संपादन केल्यामुळे जिजाऊ पुस्तक व पेन देऊन केला सत्कार.

### घाटनांदुर येथे आयएमए, रोटरी, व एएमपीए अंबाजोगाई यांच्या वतीने

# जागतिक आरोग्य दिनानिमित्त मोफत महाआरोग्य शिबिर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथे जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने आय.एम.ए अंबाजोगाई, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व ॲम्पा अंबाजोगाईच्या व तालुका वैध्यकीय कार्यालय, अंबाजोगाई, यांच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र घाटनांदुर येथे महाआरोग्य शिबिर घेण्यात आले.या शिबिराचा घाटनांदुर व पंचक्रोशीतील गोरगरीब व सर्वसामान्य कुटुंबातील रुग्णांनी लाभ घेतल्याची माहिती आयएमए अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे यांनी दिली.

आय.एम.ए. अंबाजोगाई व रोटरी क्लब अंबाजोगाई च्या वतीने दरवर्षी जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन केले जाते. ज्याचा लाभ तळागाळातील रुग्णांना झाला पाहिजे ही त्या मागची भूमिका आहे. यंदा जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने रविवार दि.६ एप्रिल रोजी घाटनांदुर येथे मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन आयएमए अंबाजोगाई, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व ॲम्पा अंबाजोगाईच्या वतीने आयोजन करण्यात आले. यावेळी घाटनांदुर व पंचक्रोशीतील असंख्य गोरगरीब व सर्वसामान्य कुटुंबातील रुग्णांनी याचा लाभ घेतला. या महा आरोग्य शिबिरात हृदयरोग, रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, पॅरालिसीस, महिलांचे आजार, लहान बालकांचे आजार, अस्थिविकार आदी आजारांवर उपचार करण्यात आले. या शिबिरात ३०० पेक्षा अधिक रुग्णांची तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात आले. हें शिबीर राज्य आय एम ए च्या संस्कृतीक समितीचे चे चेअरमन प्रसिद्ध मानसऊपचार



तज्ज्ञ डॉ राजेश इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

यावेळी अंबाजोगाई आयएमए चे अध्यक्ष डॉ नवनाथ घुगे म्हणाले की, जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने शहरातील नामांकित व तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा घाटनांदुर आणि पंचक्रोशीतील रुग्णांना देण्याचे भाग्य आम्हास लाभले.आयएमए असेल ,रोटरी क्लब असेल किंवा अँपा अंबाजोगाई असेल या सर्व संघटना सामाजिक भान राखून काम करणाऱ्या संस्था आहेत. सातत्याने ठिकठिकाणी वेगवेगळ्या निमित्ताने अशा शिबिरांचे आयोजन करून त्याचा लाभ विविध घटकांना मिळाला पाहिजे हा आमचा प्रामाणिक हेतू असल्याचे डॉ .नवनाथ घुगे यांनी सांगितले.या शिबिराच्या आयोजनासाठी आयएमएचे अध्यक्ष डॉ .नवनाथ घुगे, सचिव डॉ.उद्धव शिंदे, उपाध्यक्ष डॉ राहुल धाकडे, उपाध्यक्ष डॉ विजय लाड, कोषाध्यक्ष डॉ. विनोद जोशी, डॉ.नितीन चाटे, सहसचिव डॉ. अतुल शिंदे, डॉ. सचिन पोतदार, डॉ. अरुणाताई केंद्रे, डॉ. सारिकाताई शिंदे, डॉ निलेश तोषनिवाल, डॉ अनिल मस्के, डॉ बळीराम मुंडे, डॉ शिवराज पेस्टे, डॉ संदीप जोगदंड, अँपाच्या अध्यक्ष डॉ. सुलभाताई पाटील,डॉ. नाकाडे, डॉ.लक्ष्मीकांत कुलकर्णी, डॉ. बाळासाहेब गायकवाड, डॉ. पाटील, डॉ. ऋषिकेश घुले, डॉ माळवे, डॉ श्रीकांत मुंडे, डॉ हनुमंत चोरमले, यांच्यासह रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, भागवत कांबळे, प्रदीप झरकर, अजितदादा देशमुख, स्वप्निल परदेशी, गणेश राऊत, रुपेश रामावत, रोटरॅक्ट क्लबचे जतिन कर्नावट,संदीप जाधव, सर्वेश बजाज, मयूर परदेशी यांच्यासह इतर उपस्थित होते. तर प्राथमिक आरोग्य केंद्र घाटनांदुरचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पाथरकर मॅडम व आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महाआरोग्य शिबिराचा लाभ मिळाल्याबद्दल ग्रामीण भागातील रुग्णांनी आयएमआय अंबाजोगाई, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व अँपाचे आभार व्यक्त केले.

## श्रीराम नवमी व यात्रा महोत्सवाची छबिना मिरवणूक व कुस्त्यांच्या सामन्यांनी सांगता

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथे गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या श्रीराम नवमी जन्मोत्सव व भव्य यात्रा महोत्सवाची छबिना मिरवणुक व कुस्ती स्पर्धेने सांगता झाली.



ग्रामदैवत प्रभु श्रीरामचंद्र महाराज यांचा जन्मोत्सव व भव्य यात्रा महोत्सव गेल्या ३५० वर्षापासुन येथे अतिशय धुमधडाक्यात आणि आनंदमयी वातावरणात साजरा करण्यात येते याही वर्षी हा सोहळा तीन दिवसापासून चालु असुन आज मध्यरात्री १२ वा.प्रभु श्रीराम यांची पालखी मध्ये स्थापना करून वाजत गाजत ढोलताशांच्या व गजरात छबिना मिरवणूक निघाली होती यावेळी गावकऱ्यांनी डिजे च्या तलावर ठेका धरत छबिना मिरवणुकीत मनमुराद होऊन नाचण्याच आनंद लुटला तर पहाटे ४ वाजता छबिना मिरवणुक हनुमान मंदिरास प्रदक्षिणा घालुन विसावली यावेळी पारंपरिक भारूडाचा कार्यक्रम घेण्यात आला तर दुसऱ्या बाजुला शोभेची दारु उडवण्यात आली तर दु.३ व भव्य कुस्त्यांच्या स्पर्धेने या श्रीराम नवमी जन्मोत्सवाची व यात्रा महोत्सवाची सांगता झाली.

## महावीर जयंतीनिमित्त आष्टीत विविध कार्यक्रमाचे आयोजन

**आष्टी । प्रतिनिधी**

भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त सालाबादप्रमाणे याही वर्षी जैन समाजाच्या वतीने आष्टी शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये बुधवारी डॉ.जलाल महाराज सय्यद यांचे तर गुरुवारी डॉ.संजय कळमकर यांच्या व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले आहे.

भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त आष्टी शहरांमध्ये दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते त्याच पार्श्वभूमीवर बुधवार दिनांक ९ रोजी अरे माणसा माणसा या विषयावर डॉक्टर जलाल महाराज सय्यद यांचे तर गुरुवार दिनांक १० रोजी जगण्यातील आनंदाच्या वाटा या विषयावर डॉक्टर संजय कळमकर यांच्या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. हे कार्यक्रम आष्टी शहरातील आनंद ऋषीजी चौक येथे रात्री आठ ते दहा या वेळेत संपन्न होणार आहेत. तर गुरुवारी सकाळी भगवान महावीर स्वामी यांच्या जयंतीदिनी सकाळी ८:३० वाजता पालखी शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.या सर्व कार्यक्रमांचा लाभ आष्टीकरांनी घेण्याचे आवाहन सकल जैन समाज आष्टी यांच्यावतीने करण्यात आले आहे.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त संपूर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम होणार आहे या पार्श्वभूमीवर आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयात शांतता समितीची सभा घेण्यात आली.

## वाढदिवसावर व्यर्थ खर्च न करता वृध्दाश्रमातील आजी-आजोबांना अन्नदान करत केला मोहित पढीयार यांनी वाढदिवस साजरा



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील सुप्रसिद्ध उद्योजक मोहित पढीयार यांनी यावर्षी आपल्या वाढदिवसा निमित्त एक अभिनव व सामाजिक दृष्टिकोन घेत आपल्या वाढदिवसा निमित्त त्यांनी हार,तुरे,बॅनर आणि इतर व्यर्थ खर्च टाळून,आपल्या वाढदिवसानिमित्त मोहितजींनी आपल्या मित्र परिवार सोबत वृध्दाश्रमास भेट दिली आणि आश्रमातील आजी- आजोबांना अन्नदान केले. त्यांच्या या मदतीमुळे आश्रमातील वृद्धांना आनंद आणि समाधान मिळाले.मोहित पढीयार यांचा हा निर्णय एक आदर्श ठेवणारा ठरला, कारण त्यांनी त्यांचा वाढदिवस साध्या पद्धतीने आणि समाजातील वंचित व्यक्तींना मदत करून साजरा केला. यामुळे इतरांना देखील सामाजिक कार्यांमध्ये योगदान देण्याची प्रेरणा मिळाली. वृद्धांचे आशीर्वाद मिळवलेल्या मोहितजींना त्यांच्या या उपक्रमामुळे खूप प्रशंसा मिळाली. तसेच, आश्रमातील सर्व वृद्धांनी त्यांना आशीर्वाद देत उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्याची शुभेच्छा दिली. मोहित पढीयार यांच्या या उपक्रमामुळे त्यांनी समाजात एक सकारात्मक बदल घडवला आणि त्यांचा वाढदिवस खूपच यादगार बनला.



**मुंबई : मंगळवारी मुंबई मंत्रालयात ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांची भेट घेतली. या वेळी विविध विकास कामावर सविस्तर चर्चा झाली.यावेळी महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष एडवोकेट सतीश शिंदे व डॉ.दिनकर राउत उपस्थित होते.**

## सावता प्रतिष्ठानचे उपक्रम इतरांसाठी आदर्श ठरावेत-सिव्हिल सर्जन डॉ.संजय राऊत



**बीड । प्रतिनिधी**

माळी समाजाच्या लोकवर्गणीतून उभा राहिलेले सावता प्रतिष्ठान हे अल्पावधीतच उपक्रमशील होत आहे.या प्रतिष्ठान वरचे उपक्रम हे इतरांसाठी आदर्श ठरावेत समाजात कर्तव्यपरायणता, सहिष्णुता,सौहार्द, शांतता आणि एकात्मता निर्माण करण्यासाठी येथे विविध कार्यक्रम राबविले जावेत. श्री संत सावता महाराज यांचे मंदिर प दोन महिन्यानंतर लोकार्पित होणार आहे. त्यामुळे सर्व समाजाच्या सामाजिक धार्मिक कार्यक्रमासाठी हे मंदिर आणि सभागृह खुले होईल असा विश्वास बीड जिल्हा रुग्णालयाचे नवनियुक्त सिव्हिल सर्जन डॉ.संजय राऊत यांनी व्यक्त केला.

डॉ. संजय राऊत यांची नुकतीच जिल्हा रुग्णालयाच्या सिव्हिल सर्जन पदी नियुक्ती झाल्याबद्दल येथील श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्टच्या वतीने त्यांचा सपत्नीक हृद्य सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सावता परिषदेचे जिल्हाध्यक्ष किशोर राऊत हे होते.यावेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष श्री बाबुराव दुधाळ, नगरसेवक विशाल घाडगे, नगरसेवक शुभम धूत,नगरसेवक अमृतकाका सारडा, डॉ. अक्षय भोपळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री उद्धव राऊत, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, समता परिषदेचे नितीन राऊत, डॉ. चौधरी इ. मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात किशोर राऊत म्हणाले की मंदिर आणि सभागृह संपूर्ण समाजाचे व्यासपीठ बनले आहे. लवकरच हे मंगल कार्यालय बनेल. माळी समाजाने गट,तट,संघटना आणि पक्ष विरहित येथे एकत्रित आले पाहिजे. प्रतिष्ठानच नावलौकिक केला पाहिजे. आर्थिक सहकार्य केले पाहिजे. सर्व समाजाने हे केवळ मंदिर नसून आपल्या समाजाचे बळ ,अस्मिता आणि प्रेरणास्त्रोत असे समजून सकारात्मक राहून येथील उपक्रमांना उपस्थित राहुन सहकार्य केले पाहिजे. याप्रसंगी सर्वश्री विशाल साळुंके, उद्धव राऊत, शुभम धुत,अमृतकाका सारडा तसेच सौ आशा गोरे यांची समायोजित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्याम घाडगे यांनी तर प्रास्ताविक प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.रणजीत आखाडे यांनी केले. याप्रसंगी ट्रस्टचे सर्व विश्वस्त मंडळ आणि माळी समाजातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## आदित्य कॉलेज फार्मसिष्टच्या विद्यार्थ्यांची आनंदग्रामला भेट




बीड । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य फार्मसिच्या विद्यार्थ्यांनी भारतीय औषधनिर्माणशास्त्र संस्थेच्या अभ्यासक्रमानुसार बीड शहरापासून जवळ असलेल्या आनंदग्राम या संस्थेला भेट दिली. यावेळी तेथील अनाथ ६२ मुलांना कडधान्यासह फळ वाटप करण्यात आले.

भारतीय औषधनिर्माणशास्त्र संस्थेच्या अभ्यासक्रमानुसार अनाथ आश्रम भेट देण्याकरिता व मुलांना कडधान्य आणि फळ वाटप करण्यासाठी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य फार्मसिच्या ७० विद्यार्थ्यांनी बीड शहरापासून जवळ असलेल्या पाली येथील आनंदग्रामला भेट दिली. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून आदित्य फार्मसिचे प्राचार्य डॉ. कुमार सुरवसे, इन्फंट इंडिया ट्रस्ट आनंदग्राम पालीच्या वैष्णवी उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर अनुजा सानप, प्रतीक्षा जाधव, प्रियंका नागरगोजे यांची उपस्थिती होती. डॉ. कुमार सुरवसे यांनी एच.आय.व्ही. ग्रस्त विद्यार्थ्यांचे जीवन व मुलांना तोंड द्यावी लागणारे आव्हाने या आजाराविषयी गैरसमज बाळगू नये. कधीही बरा न होणारा, अनेकांच्या मृत्यूचं कारण ठरलेला आजार म्हटला की समोर येणाऱ्या नावांच्या यादीत एड्सचं नाव सुद्धा असतंच. कोणत्याही अन्य आजाराप्रमाणेच प्रतिकारशक्ती कमी करून शरीर क्षीण करणारी अशी ही स्थिती असली तरी त्याला जोडून येणाऱ्या सामाजिक दृष्टिकोनामुळे याबाबत अनेकदा मौन बाळगले जाते. परिणामी या आजाराविषयी गैरसमजुती वाढण्याचे प्रमाण सुद्धा जास्त आहे. गैरसमजुती न वाढवता बाधित मुलांनाही समाजात समान हक्काने जगता आले पाहिजे त्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे काळाची गरजेचे आहे असे आदित्य फार्मसीचे प्राचार्य, डॉ. कुमार सुरवसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मोराळे यांनी केले. यावेळी त्यांनी मुलांना एचआयव्ही आजारासंबंधी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर वाघमोडे यांनी तर आभार प्रा. विठ्ठल मुळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. मोराळे,चेतन शिंदे प्रयोगशाळा तंत्रज्ञ आदित्य फार्मसि बीड यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

## श्री मंगलनाथ मल्टीस्टेटला

एकूण गुंतवणूक १०२ कोटी आहे. तर संस्थेचा स्वनिधी ४० कोटी तर खेळते भांडवल ३३० कोटी आहे.या आर्थिक वर्षात संस्थेद्वारे ६९९३ कोटीपेक्षा अधिक उलाढाल करून ग्रामीण भागातील अर्थकारणाला चालना देण्याचे काम संस्थेने केले आहे.सर्व तरतुदी व खर्च वजा जात निव्वळ नफा ५.२८ कोटी झालेला असून सदरील नफ्यातून सभासदांच्या हिताच्या दृष्टीने विविध योजनां राबवण्याचा मानस संस्थेने आखलेला आहे तसेच संस्था स्थापनेपासून १२% लाभांश सभासदांना देते या पुढे देखील सभासदांना १२% प्रमाणेच लाभांश देण्याचा दृढ निश्चय संस्थेने केला आहे. संस्थेने सभासदांच्या हित जोपासून ठेवींच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत कार्य केले म्हणून सभासदांचा संस्थेवरील सदैव असणाऱ्या विश्वासास पात्र राहत संस्था अखंडित गेली २५ वर्षांपासून सातत्याने सभासदांना आधुनिक तंत्र ज्ञानाचा अवलंब करून जलद गतीने सेवा देत आहे. आणि निश्चितच पुढील काळात देखील संस्था सभासदांच्या गरजा व अपेक्षा पूर्ण करण्यास कटिबद्ध असून सभासदांच्या हिताच्या दृष्टीने कार्य करेल संस्थेच्या या घवघवित यशाबद्दल संस्थेचे सर्व सभासद,हितचिंतक,मित्र परिवार यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

## गेवराईत जिल्हा वाहतुक

दत्ता पोलीस आजिनाथ, पोलीस हवालदार पांडुरंग चालक पोलीस हवालदार राम पोलीस हवालदार नारायण गेवराई पोस्टचे पोलीस हवालदार विजय, किरण यांनी दुपारी ११ ते १ च्या दरम्यान गेवराईत विविध कलमांतर्गत लायसन्स नसणे, विमा नसणे, काळी काच, नो पार्किंग, ट्रिपलसीट या सदराखाली एकुण ९३ केसेस आणि ६५ हजार रुपयांचा दंड वाहनधारकांना ठोठावला तसेच रोख ८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

## मराठी पत्रकार परिषद

सदस्य विलास डोळसे जिल्हा प्रसिध्दी प्रमुख संजय हंगे, बीड जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत, जिल्हा उपाध्यक्ष जुनेद बागवान, चंद्रकांत राजहंस, अविनाश कदम ,कादर मकरानी, यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करून त्यांचाही सत्कार मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अविनाश कदम यांनी आष्टी तालुका संघाच्या वतीने प्रतिमा, कॅलेंडर, शाल, श्रीफळ देऊन एस. एम. देशमुख यांचा गौरव केला. या कार्यक्रमाला तालुका अध्यक्ष मधुकर तौर, हमिदखान पठाण, बीड तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके,अनिल अष्टपुत्रे, सोपान पगारे, मारोती संत्रे आदींची उपस्थिती होती.

## अंबाजोगाईतील सकलेश्वर

श्रावण महिना आणि महाशिवरात्रीला येथे विशेष पूजेचे आयोजन केले जाते. अंबाजोगाईतील या प्राचीन वैभवाचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेत आ. नमिता मुंदडा यांनी सकलेश्वर मंदिरास राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांनी या संदर्भात शासनाला पत्रव्यवहार करून मंदिराच्या ऐतिहासिक महत्त्वावर भर दिला आणि संवर्धनाची मागणी केली. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्त्वीय स्थळे आणि अवशेष अधिनियम, १९६० अन्वये सकलेश्वर मंदिर राज्य संरक्षित स्मारक म्हणून जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार सकलेश्वर मंदिराचा ९,७३७ चौ. मीटर परिसर संरक्षित करण्यात आला असून त्यापैकी १९२ चौ. मीटर हे संरक्षित स्मारक क्षेत्र असणार आहे. यानिमित्ताने अंबाजोगाईचा ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार, पर्यटनमंत्री शंभूराज देसाई, मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. मुंदडा यांनी आभार मानले आहेत. दरम्यान, सकलेश्वर मंदिराला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळाल्याने स्थानिक नागरिक, भाविक आणि इतिहासप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मंदिराच्या संरक्षणासाठी शासनाच्या या निर्णयाचे स्वागत होत आहे. या निर्णयामुळे मंदिराचे जतन आणि संवर्धन होणार असून, भविष्यात पर्यटन क्षेत्रातही मोठी भर पडणार आहे. मूळच्या आर्किटेक्ट असणाऱ्या आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्यामुळे शक्य झालेला हा निर्णय सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी ऐतिहासिक ठरणार आहे.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि.८ एप्रिल २०२५
४

# मशाल पेटवून राज्यातील आमदारांच्या घरासमोर ११ एप्रिलला आंदोलन

## कर्जमाफीसाठी प्रहारचा आक्रमक पवित्रा

वर्धा: महायुती सरकारने अर्थसंकल्पात कर्जमाफीला बगल दिल्याने शेतकऱ्यांसह विरोधी पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. शेतकरी संघटना, काँग्रेस, शिवसेना बाळासाहेब ठाकरे, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसने राज्यात विविध ठिकाणी आंदोलन, मोर्चा आयोजित केले आहेत. त्यातच आता प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी राज्यभरातील आमदारांच्या घरी जाऊन ११ एप्रिल रोजी मशाल पेटवण्याचे आदेश पक्षाच्या जिल्हाप्रमुखांना दिला आहे. त्यामुळे कर्जमाफीच्या मुद्द्यावरून राजकारण पुन्हा तापण्याची चिन्हं दिसू लागली आहेत.

बच्चू कडू यांनी प्रहारच्या जिल्हाप्रमुखांची बैठक घेतली आहे. या बैठकीत सरकारला शेतकऱ्यांची व्यथा आणि त्यांचे दुर्लक्षित हक्क आठवावेत, यासाठी आमदारांच्या घरी जाऊन मशाल पेटवण्याची भूमिका जाहीर केली आहे. महात्मा फुले यांच्या जयंतीचं औचित्य साधून प्रहारचे जिल्हाप्रमुख रात्रीच्या वेळी मशाल पेटवून सरकारचा निषेध आणि आमदारांना जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी आमदारांच्या घरासमोर जाणार आहेत, असा इशारा प्रहारकडून देण्यात आला आहे.



राज्यातील शेतकरी महायुती सरकारकडून कर्जमाफीच्या निर्णयाच्या प्रतीक्षेत आहेत. महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याचं आश्वासन दिलं आहे. परंतु आता मात्र पुढील तीन वर्ष कर्जमाफीचा निर्णय घेण्यात येणार नाही, अशी स्पष्ट भूमिका राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवारांनी अलीकडेच जाहीर केली आहे. त्यावरून राज्यभरात शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. तसेच नुकतेच कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या कर्जमाफीबद्दलच्या विधानावरून शेतकरी आणि शेतकरी नेत्यांसह विरोधकांनी संताप व्यक्त केला आहे. त्यामुळेही कर्जमाफीचा मुद्दा चर्चेत आला आहे. परंतु राज्य सरकार मात्र शेतकरी कर्जमाफीसाठी सकारात्मक नाही. त्यासाठी आर्थिक स्थिती जेमतेम असल्याची कारण पुढे केले जात आहे. राज्यातील शेतकरी नैसर्गिक आपत्तीसह सरकारी धोरणांच्या लकव्याने तोट्यात गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढला असून शेतकरी अडचणीत सापडला आहे. या परिस्थिती राज्य सरकारने मात्र कर्जमाफीबाबत ठोस भूमिका घेतली नाही. त्यामुळे प्रहारने आंदोलनाचा इशारा दिला आहे. दरम्यान, राज्यातील शेतकऱ्यांवर ३१ हजार कोटींचा कर्जाचा बोजा आहे. परंतु महायुती सरकारने शेतकऱ्यांना निवडणुकीच्या पूर्वी कर्जमाफीचं आश्वासन दिल्यामुळे शेतकरी पीक कर्ज भरण्यास टाळाटाळ करत आहेत. परिणामी बँकांची अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे महायुती सरकारने कर्जमाफी करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी शेतकरी नेते करत आहेत.




### महत्वाच्या घटना

१६६९ : मुघल शासक औरंगजेब यांनी आपल्या सैनिकांना हिंदुची सर्व धार्मिक स्थळे, मंदिर, शाळा उध्वस्त करण्यास सांगितले.
१८६० : फ्रेंच देशातील प्रकाशक, पुस्तक विक्रेता आणि शोधक एडुअर्ड-लिओन स्कॉट डी मार्टिनविले यांनी सर्वप्रथम मानवी आवाजाचे ध्वनीमुद्रण केलं.
१८६७ : रशियाकडून अलास्का हा प्रांत खरेदी करण्याच्या प्रस्तावास अमेरिकेत 'एक' मताने मंजुरी मिळाली.
१९४० : दुसरे महायुद्ध : जर्मनीने नॉर्वे व डेन्मार्क पादाक्रांत केले.
१९५३ : वॉर्नर बंधूंचा पहिला त्रिमितीय (३ ) चित्रपट, हाऊस ऑफ वॅक्स, प्रदर्शित झाला.
१९६७ : बोइंग-७६७ ने पहिले उड्डाण केले.
१९९४ : सूक्ष्मजीवशास्त्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल शास्त्रज्ञ पी. एम. भार्गव यांना 'आर. डी. बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान
१९९५ : लता मंगेशकर यांना उत्तर प्रदेशचे राज्यपाल मोतीलाल व्होरा यांच्या हस्ते 'अवधरत्न' व साहू सूरसम्मान' या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.
२००३ : इराक देशातील लोकांना सद्दाम हुसेन यांच्या तानशाही पासून मुक्ती मिळाली.
२००५ : प्रिन्स चार्ल्सचा कॅमिला पार्कर-बोल्सशी विवाह संपन्न.
२०११ : प्रख्यात भारतीय समाजसेवक अण्णा हजारे दिल्ली येथे लोकपाल बील कायदा पास करण्यासठी करीत असलेले आमरण उपोषण सरकारने आपली मागणी मान्य केल्यानंतर बंद केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३३६ : तैमूरलंग मंगोल सरदार (मृत्यू: १८ फेब्रुवारी १४०५)
१७७० : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ थॉमस योहान सीबेक यांचा जन्म.
१८२८ : गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' समाजसुधारक, राष्ट्रवादी विचारसरणीचे व स्वदेशी चळवळीचे प्रणेते आणि पुणे सार्वजनिक सभेचे संस्थापक (मृत्यू: २५ जुलै १८८०)
१८८७ : विष्णू गंगाधर तथा 'दादासाहेब' केतकर पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (मृत्यू: १९ आक्टोबर १९५०)
१८९३ : राहूल सांकृतायन इतिहासकार (मृत्यू: १४ एप्रिल १९६३)
१९२५ : लिंडा गुडमन अमेरिकन ज्योतिषी व लेखिका (मृत्यू: २१ आक्टोबर १९९५)
१९२९ : भारतीय पद्मभूषण, पद्मश्री, संगीत-नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित शरण राणी यांचा जन्मदिन.
१९३० : अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ एफ. अल्बर्ट कॉटन यांचा जन्म.
१९४८: जया भादुरी अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

५८५ : ५८५ इ.स. पूर्व : जपानचा पहिला सम्राट सम्राट जिम्मू यांचे निधन. (जन्म: १३ फेब्रुवारी इ. स. पूर्व ७११)
१६२६ : सर फ्रँन्सिस बेकन इंग्लिश तत्त्ववेत्ते व मुत्सद्दी (जन्म: २२ जानेवारी १५६१)
१६९५ : वैशाख शु. ६ शके १६१७ पंडितकवी वामनपंडित यांनी भोगाव येथे समाधी घेतली. भर्तृहरीच्या शतकत्रयीचा अनुवाद आणि यथार्थदीपिका ही गीतेवरील टीका हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. (जन्म: ? ? १६०७)
१९०१ : भारतीय रहस्यवादी, तत्वज्ञ, विद्वान, सुधारक व जैन कवी श्रीमद श्रीरामचंद्र यांनी समाधी घेतली.
१९५२ : प्रख्यात काश्मीर खोऱ्यातील कवी महजूर यांचे निधन.
१९८१ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी दुर्गाबाई देशमुख यांचे निधन.
१९९४ : चंद्र राजेश्वर राव स्वातंत्र्यसैनिक, तेलंगणाच्या लढ्याचे प्रवर्तक, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस (जन्म: १९१४)
१९९८ : डॉ. विष्णू भिकाजी तथा वि. भि. कोलते महानुभाव पंथाचे अभ्यासक, विचारवंत व तत्त्वज्ञ, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: २२ जून १९०८)
२००१ : बेहराम कॉन्ट्रॅक्टर ऊर्फ 'बिझी बी' पत्रकार व स्तंभलेखक, 'आफ्टरनून डिस्पॅच अँड कुरियर' या सायंदैनिकाचे संपादक (जन्म: ११ आक्टोबर १९३०)
२००१ : शंकरराव खरात दलित साहित्यिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: ११ जुलै १९२१)
२००९ : शक्ती सामंत हिन्दी व बंगाली चित्रपट दिग्दर्शक व निर्माते (जन्म: १३ जानेवारी १९२६)
२००९ : अशोकजी परांजपे गीतकार (जन्म:)

# भेंडीची लागवड करण्यासाठी वापरा फायदेशीर जाती



उत्पन्न वाढवण्यासाठी शेतकरी हंगामानुसार त्यांच्या शेतात भाजीपाल्याची शेती करतात. भेंडीच्या ज्या सुधारित जातींबद्दल आपण बोलत आहोत त्या पुसा सावनी, परभणी क्रांती, अर्का अनामिका, पंजाब पद्मिनी आणि अर्का अभय या जाती आहेत. या सर्व जाती कमी वेळात चांगले उत्पादन देण्यास सक्षम आहेत. या जातींची मागणी वर्षभर बाजारात असते. भेंडीच्या या जातींची लागवड देशातील अनेक राज्यांमध्ये केली जाते. भेंडीच्या ५ सुधारित जातींमध्ये जीवनसत्त्वे, फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि खनिजे तसेच कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि लोह मुबलक प्रमाणात असते. यामुळे या भेंडीच्या जातींबद्दल आज आम्ही तुम्हाला माहिती देणार आहोत.

१) पुसा सावनी - भेंडीची ही सुधारित जात उन्हाळा, थंडी आणि पावसाळ्यात सहज पिकवता येते. पुसा सावनी जातीची भेंडी पावसाळ्यात सुमारे ६० ते ६५ दिवसांत तयार होते. २) परभणी क्रांती - भेंडीची ही जात पिटा रोगास प्रतिरोधक मानली जाते. जर शेतकऱ्यांनी बियाणे शेतीत लावले तर त्यांना सुमारे ५० दिवसांत फळे येऊ लागतात. परभणी क्रांती जातीचा रंग गडद हिरवा असतो आणि तिची लांबी १५-१८ सेमी असते. ३) अर्का अनामिका वाण- ही जात यलो मोझॅक विषाणू रोगाशी लढण्यास सक्षम आहे. या जातीच्या भेंडीमध्ये केस आढळत नाहीत आणि त्याची फळे अतिशय मऊ असतात. ही जात उन्हाळा आणि पावसाळ्यात चांगले उत्पादन देण्यास सक्षम आहे. ४) पंजाब पद्मिनी भेंडीची ही जात पंजाब विद्यापीठाने विकसित केली आहे. या प्रकारची भेंडी सरळ आणि गुळगुळीत असते. त्याच वेळी जर आपण त्याच्या रंगाबद्दल बोललो तर ही भेंडी गडद रंगाची आहे. ५) अर्का अभय - ही जात पिवळ्या मोझॅक विषाणू रोगाशी लढण्यास सक्षम आहे. अर्का अभय जातीची भेंडी शेतात लागवड केल्यावर काही दिवसात चांगले उत्पादन देते. या जातीची भेंडीची झाडे १२०-१५० सेमी उंच आणि सरळ असतात.

# कांदा संच तयार करण्याची पद्धत

कांद्याची लागवड अनेक प्रकारे केली जाते. योग्य उत्पादन मिळविण्याचे अनेक मार्ग आहेत. यापैकी एक म्हणजे सॅट्स उत्पादन पद्धत. हे एक जुने तंत्रज्ञान आहे, परंतु आजही ते मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. या पद्धतीचा वापर करून शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळते.

कांदा हे नगदी पीक आहे, म्हणून त्याच्या लागवडीला फायदेशीर शेती म्हणतात. बाजारात कांद्याला नेहमीच मागणी असते. त्याच वेळी, कांद्याशिवाय जेवणाची चव मंद राहते. तसेच, कांद्याचा वापर शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पदार्थांमध्ये केला जातो. कांद्यामध्ये अनेक पौष्टिक आणि औषधी गुणधर्म देखील आढळतात. कांद्याने मधुमेह आणि रक्तदाब नियंत्रित ठेवता येतो. खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामात शेतकरी मोठ्या प्रमाणावर कांद्याची लागवड करतात. पण तुम्ही कांदा संच उत्पादन पद्धतीबद्दल ऐकले आहे का? तुम्ही ऐकले नसेल तर ही पद्धत काय आहे ते आम्ही तुम्हाला सांगत आहोत. तसेच आम्ही तुम्हाला सांगतो की या पद्धतीने शेती केल्यास शेतकरी एका एकरात २० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळवू शकतात. आम्हाला कळू द्या.

उत्पन्न पद्धत काय आहे?: कांद्याची लागवड अनेक प्रकारे केली जाते. योग्य उत्पादन मिळविण्याचे अनेक मार्ग आहेत. यापैकी एक म्हणजे उत्पादन पद्धत. हे एक जुने तंत्रज्ञान आहे, परंतु आजही ते मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. या पद्धतीचा वापर करून शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळते. या पद्धतीत प्रामुख्याने



शेतीच्या चार पायऱ्यांचा अवलंब केला जातो. हे चार टप्पे आहेत बीजन तयार करणे, खतांचा वापर, बीजप्रक्रिया आणि पेरणी. या चार पद्धतींनी सेट पद्धतीने कांद्याची लागवड केली जाते.पेरणीची तयारी - मार्चच्या पहिल्या आठवड्यापासून, शेतकरी एन-५३ आणि भीमा डार्क रेड जातीच्या कांद्याची पेरणी करतात. या प्रक्रियेत कांदा पेरताना दिवसभर सूर्यप्रकाश राहील अशा ठिकाणी बेड तयार केला जातो आणि काळजी घेणे सोपे जाते. तसेच, बेडची लांबी तीन मीटर, रुंदी एक मीटर आणि उंची १५ ते २० सेमी असावी.

खताचा वापर - या मशागतीच्या पद्धतीमध्ये पेरणीपूर्वी २० ते २५ किलो कुजलेले शेणखत आणि १०० ग्रॅम मिश्र खत प्रति बेडमध्ये वापरावे. बीजप्रक्रिया- पेरणीपूर्वी बियाण्यास कॅप्टन, बाविस्टिन, थिरम यांसारख्या बुरशीनाशकाची २ किंवा ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्याची प्रक्रिया करावी. बिया कोरड्या भांड्यात ठेवा आणि ते औषधासह हलक्या पाण्याच्या संपर्कात येईपर्यंत ढवळत राहा, जेणेकरून औषध बियांना चांगले चिकटेल. पेरणी- या पद्धतीने शेती करण्यासाठी पेरणीपूर्वी बिया सावलीत वाळवाव्यात. त्यानंतर प्रति बेड १२५ ते १५० ग्रॅम बियाणे पेरणी करावी. अशाप्रकारे खरिपात सुमारे २० क्विंटल प्रति हेक्टर दराने कांद्याचे चांगले उत्पादन घेता येते. पद्धतीमध्ये या चार पद्धतींचा समावेश करण्यात आला आहे ज्याचा वापर करून शेतकरी चांगले उत्पादन घेऊ शकतात. कांदा आता फायदेशीर पीक म्हणून सिद्ध होत आहे, त्यामुळे शेतकरी पद्धतीचा पुरेपूर लाभ घेऊ शकतात.

# भाजीपाल्यासाठी 'रिले क्रॉपिंग' पद्धतीचा अवलंब

भाजीपाला लागवडीच्या वेगवेगळ्या पद्धतीद्वारे शेतकरी आपले उत्पन्न वाढवू शकतात. यातीलच एक पद्धती आहे रिले क्रॉपिंग. शेतकरी भाजीपाला पिकांचे चांगले उत्पादन मिळविण्यासाठी रिले क्रॉपिंग पद्धतीचा अवलंब करू शकतात.

रिले क्रॉपिंग सिस्टीम हे एक तंत्र आहे ज्याद्वारे एकाच जमिनीवर वेगवेगळ्या भाज्यांची लागवड करता येते. हे एक खास शेती तंत्र आहे ज्याचा अवलंब करून शेतकरी अधिक उत्पादनासोबतच उत्पन्न वाढवू शकतात. विशेष म्हणजे यामध्ये मागील पीक काढण्यापूर्वी पुढील पीक पेरले जाते.

रिले क्रॉपिंग सिस्टम तंत्रज्ञान काय आहे?

रिले क्रॉपिंग सिस्टीम ही एक प्रणाली किंवा तंत्र आहे ज्यामध्ये एका शेतात एक पीक लावले जाते, तर मागील पिकातील उर्वरित ओलावा आणि पोषक तत्वांचा फायदा घेण्यासाठी त्याच शेतात दुसरे पीक नंतर लावले जाते. यामध्ये पहिले पीक काढण्यापूर्वी दुसरे पीक पेरले जाते. त्यामुळे पहिल्या पिकातील ओलावा दुसऱ्या पिकात जातो त्यामुळे सिंचनाची कमी गरज भासते, म्हणजेच कमी सिंचनात जास्त पिकांना या पद्धतीचा फायदा होऊ शकतो. जमीन आणि संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी आणि उत्पादन वाढवण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरू शकते.

रिले क्रॉपिंग सिस्टम तंत्रज्ञानाचे फायदे :



रिले क्रॉपिंग पद्धतीचा अवलंब केल्याने अनेक फायदे मिळतात. भाजीपाल्याचे बहुपिक घेतल्याने जास्त उत्पादन मिळते. बहुपीक शेतीमुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढू शकते. या तंत्रज्ञानाचा अवलंब करून वर्षभर रोजगार मिळू शकतो म्हणजेच वर्षभर पैसा मिळवता येतो.मोठ्या प्रमाणात खताची आवश्यकता नसते. खताचा वापर संतुलित प्रमाणात केला जातो. पीक फेरपालटद्वारे जमिनीचे आरोग्य राखता येते. पाण्याच्या बचतीबरोबरच जमिनीची सुपीकताही राखता येते. या तंत्राने चांगले उत्पादन मिळू शकते, तथापि, पिकाचे चांगले उत्पादन हे जातीची निवड, योग्य पेरणीची पद्धत, संसाधनांचा योग्य वापर, कीड व्यवस्थापन, वेळेवर काढणी या गोष्टींवर अवलंबून असते.

या तंत्राने कोणत्या भाज्यांची लागवड करता येईल?

बहुपीक शेती अंतर्गत, रिले क्रॉपिंग तंत्राचा वापर करून अनेक प्रकारच्या भाज्या पेरल्या जाऊ शकतात. यामध्ये कोणते पीक कोणासोबत पेरणे चांगले आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे जेणेकरून या तंत्राचा जास्तीत जास्त फायदा मिळू शकेल. या तंत्रात कोणते पीक घेऊन कोणते पीक घ्यायचे याची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

काकडीसह मिरचीची लागवड : बहुपिक शेतीत काकडींसोबत मिरचीची लागवड करता येते. यामध्ये रिले क्रॉपिंग तंत्राचा वापर करून नोव्हेंबर ते मार्च आणि फेब्रुवारी ते ऑक्टोबर अशी दोनदा पेरणी केली जाते. मिरचीची पेरणी फेब्रुवारीमध्ये शेताच्या बांधावर केली जाते.

मटारसह दुधीभोपळा लागवड : या तंत्रात नोव्हेंबर ते एप्रिल आणि फेब्रुवारी ते ऑक्टोबर या कालावधीत शेती केली जाते. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे हिवाळ्यात दुधीभोपळ्याची रोपवाटिका प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये तयार करावी आणि ती फेब्रुवारीमध्ये तयार केलेल्या बेडमध्ये २.५ मीटर ४५ सें.मी. अंतरावर दोन्ही बाजूला लागवड करावी.

काकडी आणि घोसाळे लागवड : या तंत्राने नोव्हेंबर ते एप्रिल या कालावधीत काकडी आणि घोसाळ्याची लागवड केली जाते. याशिवाय मार्च ते ऑक्टोबर दरम्यानही लागवड करता येते. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की घोसाळ्याची पेरणी किंवा रोपण मार्चमध्ये ३ मीटर अंतरावर करावे.

कोणत्या पिकांची रिले क्रॉपिंग करू नये? अशी अनेक पिके आहेत ज्यांची एकत्र पेरणी करू नये कारण अशाच प्रकारच्या भाज्या कीटक किंवा रोगांना संवेदनशील असतात. ते एकत्र घेतल्याने पिकाचे कीड व रोगांमुळे नुकसान होण्याची शक्यता जास्त असते. उदाहरणार्थ, पीक पद्धतीमध्ये टोमॅटो आणि मिरची एकत्र पेरता कामा नये.

# कांदा पिकावरील हा आहे सर्वात धोकादायक रोग

राज्यात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादन घेतले जाते. कांदा पिकाचे उत्पादन घेताना शेतकऱ्यांना अनेक औषध फवारण्या कराव्या लागतात. मात्र, कांदा पिकावरील रोग नियंत्रण करण्यात शेतकऱ्यांना अपेक्षित यश मिळत नाही. कांद्यावरील सर्व रोगांमध्ये पीळ रोग हा सर्वात धोकादायक रोग मानला जातो. कांदा लागवडीनंतरच्या पहिल्या टप्प्यात हा रोग आढळून येतो. ज्यामुळे लागवडीनंतर ऐन कांदा रोप पीक अवस्थेत पदार्पण करत असताना, कांद्यावर हा रोग दिसून येतो. परिणामी, एकरी उत्पादनात मोठी घट होण्यास हा रोग कारणीभूत ठरतो.कांदा हे राज्यातील महत्त्वाचे पीक आहे. याशिवाय देशातील अनेक राज्यांमध्ये कांद्याचे उत्पादन घेतले जाते. प्रामुख्याने वर्षातून तीन वेळा कांदा लागवड केली जाते. कांदा हा शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पदार्थांमध्ये वापरला जातो. कांद्यामध्ये अनेक पौष्टिक आणि औषधी गुणधर्म देखील आढळतात. त्यामुळे त्याची मागणी कायम आहे. उत्पादन थोडे कमी झाले की भाव वाढतात? मात्र, गेल्या दोन ते तीन वर्षांपासून प्रतिकूल हवामान आणि योग्य भाव न मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.पीळ रोगाची लक्षणे : कांद्यावरील पीळ रोगाची सुरुवातीची लक्षणे म्हणजे पानांवर पिवळे ठिपके पडतात. जे पानाच्या संपूर्ण भागावर पसरतात. या रोगाला ट्विस्टर किंवा स्प्रिंग असेही म्हणतात. कोलेटोट्रिचम बुरशीचे फिलामेंटस जमिनीत वर्षानुवर्षे आणि प्रभावित पिकांच्या अवशेषांमध्ये महिने टिकून राहू शकतात.

# अखेर लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे काम पुर्णत्वाकडे

## स्मशानभूमीत सरण रचुन केलेल्या ठिय्या आंदोलनाचे यश





लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील १२ ते १४ वर्षापुर्वी बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीचे ढासळलेल्या अवस्थेतील बांधकाम आणि उडुन गेलेले पत्रे यामुळे दुरावस्था झाली होती त्यामुळे पावसाळ्यात अंत्यसंस्कार करण्यासाठी मोठी अडचण निर्माण होऊन मृतदेहाची हेळसांड होत होती. नविन स्मशानभूमी बांधण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सहकारी विक्रांत वाणी,कृष्णा वायभट,आरूण ढवळे यांनी ढासळलेल्या बांधकामावरच सरण रचुन ठिय्या आंदोलन केले होते. त्याची दखल घेत आ.संदिप क्षीरसागर यांनी जिल्हा वार्षिक (दहन/ दहनभुमी) जनसुविधा विशेष अनुदान योजनेंतर्गत मुलभूत सुविधांसाठी सन २०२२-२३ आर्थिक वर्षाकरीता ग्रामपंचायत लिंबागणेश येथे स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरणासाठी ८ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करत प्रशासकीय मान्यता दिली होती. आता काम पुर्णत्वाकडे गेले असुन नविन स्मशानभूमी पावसाळ्यात होणारी मृतदेहाची हेळसांड थांबणार असल्याने ग्रामस्थांनी याबद्दल समाधान व्यक्त केले असुन उर्वरित पेलव्हिक ब्लॉक,पाण्याचा हौद, संरक्षक भिंत आदी कामांसाठी पाठपुरावा करणार आहोत.

बीड जिल्ह्यातील १३९४ गावातील स्मशानभूमीची दुरावस्था असुन ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोयच नाही. त्यामुळे पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड याबरोबरच अंत्यसंस्कार रोखल्याने गावात वादविवाद होण्याच्या घटना घडत आहेत. काल दि.७ सोमवार रोजी धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण येथील भिल्ल समाजातील संजय नामदेव माळी यांचा मृतदेह धारूर तहसील कार्यालयासमोर ३ तास ठेवण्यात आला होता. यापुर्वीही केज तालुक्यातील सोनेसांगवी( सुर्डी) येथील ४ महिन्यात ३ मागासवर्गीय महिलांचा अंत्यसंस्कार रोखल्याने तहसील कार्यालयात मृतदेह आणुन ठेवला होता.तर गेवराई तालुक्यातील सुशी वडगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर मृतदेह ठेवण्यात आला होता तर बीड तालुक्यातील पालवण याठिकाणी अंत्यसंस्कार रोखल्याने भांडणे होऊन अट्रसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. गेल्या ३ वर्षापासून आम्ही शासन दरबारी निवेदने तसेच लक्ष्यवेधी आंदोलनाद्वारे स्मशानभूमीची सोय करण्याची मागणी करत आहोत.परंतु प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांना याचे सोयरसुतक नसल्याचे दिसून येते.अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी बोलून दाखवली.

## वक्फ बोर्ड बिल रद्द करा व इतर मागण्यांसाठी महाराष्ट्रातील पहिले धरणे आंदोलन



पाटोदा। प्रतिनिधी

वक्फ बोर्ड बिल दुरुस्ती विधेयक रद्द करावे, मुस्लिम समाजावर होणाऱ्या बेकायदेशीर कारवाया थांबवाव्यात आणि अर्धामसला मस्जिद स्फोट करणाऱ्या आरोपीला फाशी द्यावी, या प्रमुख मागण्यांसाठी पाटोदा तालुक्यातील पाटोदा तहसील कार्यालय समोर आज धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले. या आंदोलनात शेकडो मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन शांततेच्या मार्गाने आपले असंतोष व्यक्त केले.आंदोलनाच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे होत्या: १. वक्फ बोर्ड बिल दुरुस्ती विधेयक रद्द करा मुस्लिम समाजाच्या धार्मिक हक्कांचा आणि संपत्तीचा सन्मान राखण्यासाठी वक्फ बोर्ड बिलाची दुरुस्ती करणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. त्यामुळे, या विधेयकाचे रद्द करणे आवश्यक आहे.

२. मुस्लिम समाजावर होणाऱ्या बेकायदेशीर कारवायांची दखल घ्या मुस्लिम समाजावर होणाऱ्या अन्यायकारक कारवायांचा विरोध करण्यात आला, ज्यामुळे समाजातील असंतोष वाढत आहे.
३. अर्धामसला मस्जिद स्फोट करणाऱ्या आरोपीला फाशी द्या अर्धामसला मस्जिद स्फोटप्रकरणातील आरोपींना कडक शिक्षा दिली जावी, आणि समाजातील विश्वास पुन्हा प्रस्थापित करावा, अशी मागणी करण्यात आली. आंदोलनात प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, वक्फ संपत्तीवरील नियंत्रण मुस्लिम समाजाच्या धार्मिक हक्कांवर घाला आणते, तसेच वक्फ संपत्तीसाठी सरकारने केलेले हस्तक्षेप सामाजिक अशांततेचा कारण ठरू शकतात. यावर त्वरित कृती करणे आवश्यक आहे, असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे होते.आंदोलनातील सहभागी नागरिकांनी वक्फ संपत्तीसाठी सरकारकडून अधिक लक्ष आणि संरक्षण मिळावे, तसेच समाजातील धार्मिक स्थळांवर होणाऱ्या आक्रमणांच्या विरोधात कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचे म्हटले.आंदोलनाच्या समारोपानंतर, तहसील कार्यालयास एक निवेदन सादर करण्यात आले, ज्यात वरील मागण्या सरकारपर्यंत पोहोचवून त्यावर त्वरित कार्यवाही करण्याची अपेक्षा व्यक्त केली गेली. यावेळी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्या नागरिकांची एकजूट आणि उत्साही सहभाग दिसून आला.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला परळीत मिळणार नवी कार्यकारिणी!

### राजेभाऊ फड यांनी घेतली खा.बजरंग सोनवणे व राजेंद्र मस्के यांची भेट



परळी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या परळी विधानसभा मतदार संघातील कार्यकारिणीला नवे शिलेदार मिळण्याचे संकेत आहेत. नवी कार्यकारिणी स्थापन करण्याच्या अनुषंगाने पक्षाच्या वरीष्ठ नेत्यांची सोमवारी चर्चा झाली. पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांची भेट घेऊन पक्षाच्या संघटन बांधणीबद्दल सखोल चर्चा केली. त्यामुळे आता पक्षाच्या रिक्त असलेल्या पदांवर नव्या नियुक्त्या केल्या जाणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. आगामी काळात रचनात्मक बांधणी आणि धोरणात्मक काम करण्यासंदर्भात यावेळी या भेटीत चर्चा झाली. याप्रसंगी पक्षाचे नेते अंकुशराव ढोबळे, बाबासाहेब शिंदे, अक्षय मुंडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.


परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी पक्षाचे नेते राजेभाऊ फड सक्रिय झाले आहेत. सोमवार, दिनांक ०७ एप्रिल रोजी त्यांनी खा.बजरंग बप्पा सोनवणे व पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांची भेट घेऊन सखोल चर्चा केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा, देशाचे नेते शरदचंद्र पवार यांचा प्रेरक विचार घेऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी फौज मतदारसंघात उभी करणार असून, पक्षाला बळकटी येईल अशा स्वरूपाचे काम करणाऱ्या आणि पक्षाशी निष्ठेने राहणाऱ्या कार्यकर्त्यांना पदाच्या माध्यमातून काम करण्याची संधी मिळणार असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले आहे. सत्तेच्या विरोधात असलो तरी पक्षाला मानणारा मोठा वर्ग या मतदारसंघात पक्षाच्या पाठीशी आहे. त्यामुळे शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी युवक - युवती यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आगामी काळात धोरणात्मक काम करण्यात येणार आहे. तसेच भविष्यकाळात येणाऱ्या सर्व निवडणुकांना सामोरे जाण्यासाठी रचनात्मक बांधणी आणि धोरणात्मक काम करण्याची तयारी आम्ही ठेवली असल्याचे राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे. या भेटीप्रसंगी पक्षाचे नेते अंकुश ढोबळे, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, अक्षय मुंडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## ब्रह्माकुमारी संस्थेच्या मुख्य प्रशासिका दादी रतनमोहिनी कालवश

### आध्यात्मिक क्षेत्रातील दिर्घायू रत्न हरपले : १० एप्रिल रोजी अत्यंसंस्कार

माजलगाव। प्रतिनिधी

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय शाखा माजलगाव, मुख्य ठिकाण माउंट आबूच्या मुख्य प्रशासिका राजयोगीनी ब्रह्माकुमारी रतनमोहिनीजी यांचे आज दि.८ एप्रिल रोजी सकाळी१:२० मिनीटांनी अहमदाबाद येथील जायडस हॉस्पिटल मध्ये उपचारादरम्यान निधन झाले. त्यांचे अंत्यसंस्कार परवा दि.१० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता ब्रह्माकुमारीज् शांतीवन येथे करण्यात येतील. ब्रह्माकुमारी रतनमोहिनीदादी गेल्या दोन दिवसांपासून श्वासाच्या अडचणीमुळे अस्वस्थ्य होत्या. त्यांना तातडीने अहमदाबाद येथील जायडस हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. वैद्यकिय टीमने शर्थीचे प्रयत्न केले तथापि, त्यांनी प्राणत्याग केले.



दिघार्यु दादी रतन मोहिनीजी : राजयोगाच्या नियमित साधक असलेल्या ब्रह्माकुमारीज्? संस्थेच्या प्रमुख पदी असलेल्या दादींचे वय १०१ वर्षे होते. शेवटपर्यंत त्यांची प्रकृती स्वस्थ्य होती. अनुशासन आणि संयमीत जीवन जगलेल्या दादीजींनी देश-विदेशातील लाखों व्यक्तिंच्या जीवनात मूल्यसंस्कार रुजविलेत, जगातील सर्वांत मोठ्या आध्यात्मिक संस्थेचे नेतृत्व करीत असूनही हसतमुखाने आणि मधुरवाणीने त्यांनी लाखों राजयोगी परिवारांना कुटुंबप्रमुखाचे प्रेम दिले.

अंत्यसंस्कार शांतीवन येथे : ज्या भूमीत त्यांनी देशविदेशातील व्यक्तिंना जीवनाची दिशा दाखविली अशा आबूरोड येथील पवित्र शांतीवन येथे त्यांचे अंत्यसंस्कार १० एप्रिल रोजी स.१० वाजता होणार आहेत. तत्पूर्वी ८ एप्रिल रोजी शांतीवन येथील सभागृहात त्यांच्या पार्थीवाचे दर्शन घेता येईल. ९ एप्रिल रोजी ब्रह्माकुमारीजचे सर्व प्रमुख वास्तु पांडव भवन येथील बाबांचा कमरा, शांती स्तंभ, बाबा कुटीया, हिस्ट्री हॉल या आध्यात्मिक चार धाम येथे दर्शनार्थ नेण्यात येईल तसेच ओमशांती भवन, ज्ञानसरोवर, पीसपार्क येथून परत शांतीवन येथील कॉन्फ्रेन्स हॉल येथे अंतिम दर्शनार्थ ठेवण्यात येईल. देश-विदेशातून शोक संवेदना . दादी रत्नमोहिनी यांचे आध्यात्मिक प्रभामंडळाने देश विदेशातील प्रत्येक देशात आध्यात्मिक साधक वर्ग होता. त्याचप्रमाणे राजकिय, शैक्षणिक, सामाजिक, आध्यात्मिक आणि इतर क्षेत्रातील मान्यवर शोक संवेदना व्यक्त करीत आहेत.

## वृध्दाश्रमातील आजी-आजोबांना अन्नदान करत आपला वाढदिवस साजरा

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सुप्रसिद्ध उद्योजक मोहित पढीयार यांनी यावर्षी आपल्या वाढदिवसा निमित्त एक अभिनव व सामाजिक दृष्टिकोन घेत आपल्या वाढदिवसा निमित्त त्यांनी हार,तुरे,बॅनर आणि इतर व्यर्थ खर्च टाळून,आपल्या वाढदिवसा मोहितजींनी आपल्या मित्र परिवार सोबत वृध्दाश्रमास भेट दिली आणि आश्रमातील आजी- आजोबांना अन्नदान केले. त्यांच्या या मदतीमुळे आश्रमातील वृद्धांना आनंद आणि समाधान मिळाले.मोहित पढीयार यांचा हा निर्णय एक आदर्श ठेवणारा ठरला, कारण त्यांनी त्यांचा वाढदिवस साध्या पद्धतीने आणि समाजातील वंचित व्यक्तींना मदत करून साजरा केला. यामुळे इतरांना देखील सामाजिक कार्यांमध्ये योगदान



देण्याची प्रेरणा मिळाली. वृद्धांचे आशीर्वाद मिळवलेल्या मोहितजींना त्यांच्या या उपक्रमामुळे खूप प्रशंसा मिळाली. तसेच, आश्रमातील सर्व वृद्धांनी त्यांना आशीर्वाद देत उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्याची शुभेच्छा दिली. मोहित पढीयार यांच्या या उपक्रमामुळे त्यांनी समाजात एक सकारात्मक बदल घडवला आणि त्यांचा वाढदिवस खूपच यादगार बनला.

## तथागत बुद्धांच्या मूल्यांचे अविष्करण

### जयभिम महोत्सव: मडवॉक नाटिकाने जिंकली रसिकांची मने

बीड । प्रतिनिधी

समुदायाच्या सृजनशील आणि धार्मिक विकासात बुद्धांच्या मूल्यांचे अध्ययन, अविष्करण आणि शाश्वत रुजवणूक, या विषयावर तीन विद्यार्थी एचडी करण्यासाठी गुफांमध्ये येतात, त्या गुफांमध्ये आल्यानंतर बेंजामिन नावाचा गाईड त्यांना भेटतो त्यांना तो बुद्धाचे तत्त्वज्ञाने टर्मिनोलॉजीमध्ये न सांगता तर अनुभवातून सांगतो. असा विषय मडवॉक नाटकात दाखविण्यात आला असून कबीर जाधव यांच्या सरस अभिनयाला रसिकांची दाद मिळाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने सामाजिक न्याय भवन येथे ४ ते १४ एप्रिल रोजी जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने सोमवार (दि.७) एप्रिल रोजी

मडवॉक आणि रुपेश निकाळजे यांचा क्रांतीचा साक्षीदार या नाटकांचा प्रयोग झाला.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा.राहुल सोनवणे, प्रमुख पाहुणे संजय पाटील देवळाणकर, एस.टी. गायकवाड आदी उपस्थित होते. मडवॉक नाटकातुन बुद्धांचे तत्वज्ञान अतिशय सोप्या भाषेत रंगमंचावर सादर करण्यात आले.त्याचबरोबर बुद्धांच्या लेण्यांचे व त्यांच्या मुर्त्यांचे खंडन व चोरी यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे. बुद्धाला केवळ वचनापुरते न ठेवता, आचरणात आणावे हा संदेश मडवॉक नाटकातून देण्यात आला. मडवॉक नाटकाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. नितीन वडमारे यांनी केले.आभार प्रा.अशोक गायकवाड यांनी मानले.जयभीम महोत्सवातील उर्वरित कार्यक्रमांना जनतेने उपस्थित रहावे. असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.


**सायटेशन**

**मा.श्रीमती एफ.बी.बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ६१३/२०२५**

**विधीज्ञ श्री. बारगजे ए. एम.**

**सिमा व इतर वि. निरंक**

**मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदारः १) सिमा भ्र. राजेंद्र वखरे, वय४५ः वर्षे, धंदाः नौकरी, रा. संत नामदेव नगर, धानोरा रोड, बीड ता. जि. बीड, २) श्रेयस पि. राजेंद्र वखरे, वयः २२वर्षे, धंदाः शिक्षण, रा. वरील प्रमाणे, ३) श्रेया पि. राजेंद्र वखरे, वयः २० वर्षे, धंदाः शिक्षण, रा. वरील प्रमाणे, ४) कमल भ्र. रामकिसन वखरे, वयः ७५वर्षे, धंदाः घरकाम, रा. वरील प्रमाणे वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे राजेंद्र पि. रामकिसन वखरे, राहणार- संत नामदेवनगर, धानोरा रोड, बीड ता. जि. बीड हे दिनांक ११/०३/२०२५ रोजी संत नामदेवनगर, धानोरा रोड, बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क्र. ३ हि मयताची मुलगी तर अर्जदार क्र. ४ हि मयताची आई आहे. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत. मयत नामे राजेंद्र पि. रामकिसन वखरे, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याना सदरह मयत राजेंद्र पि. रामकिसन वखरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख ०८/०५/२०२५ आहे.**

**आज दिनांक ०८/०४/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.**

स्वाक्षरित
**क लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
व. स्तर बी

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड


## मोबाईलमुळे मुले होतायेत 'स्वमग्न'-डॉ. टेकाळे

### कोविडनंतर दिवसेंदिवस ' व्हर्च्यूअल' ऑटीझम वाढतोय

जागतिक स्वमग्न जागृती दिन पाटोदा प्रतिनिधी : व्यग्र जीवनशैली, दोन्ही पालकांची वाढलेली व्यवधाने यामुळे दोन्ही पालक मुलांशी खेळ-संवादासाठी वेळ देऊ शकत नाहीत. लहान झालेली कुटुंबे, हरवलेला पालक - पाल्य संवाद यामुळे मुले मोबाईलच्या सत्याभासी दुनिनेत आधार शोधतात. दिवसातील ३ ते ४ तास सलग मोबाईल पाहण्याच्या सवयीमुळे मुले व्हर्च्यूअल ऑटिझमचे शिकार होत आहेत, असे धक्कादायक निष्कर्ष स्वमग्नता आजाराचे अभ्यासक, तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. २ एप्रिल दिवस जागतिक स्वमग्नता जागृती दिवस म्हणून साजरा होतो. नैसर्गिक किंवा जन्मतः स्वमग्न मुलांचा हा आजार पूर्णपणे बरा होत नाही. काही मुले स्वमग्न तसेच हायपर क्टीव्ह अशी दोन्हीही असतात. ऑटीझम स्पेक्ट्रम डिसॉर्डर ही नैर्सगिक स्वमग्नता असून त्यामागे विविध कारणे आहेत. मात्र व्हर्च्यूअल ऑटिझम हा मानवनिर्मित असल्याचे मत अभ्यासक व्यक्त करत आहेत. कोविड काळात मुलांचा अभ्यास मोबाईलव्दारे अधिक होता.

खेळ, शाळा बंद झाल्यामुळे मुले बहुतांश वेळ मोबाईलवर घालवत त्यामुळे मुलांच्या हालचाली मंदावल्या आणि त्याच्या अतिरेकानंतर अनेकजणांना व्हर्च्यूअल



ऑटिझम या आजाराने ग्रासले, असा अभ्यास तज्ज्ञांनी प्रकाशित केल्याची माहिती स्वमग्न मुलांसाठी शाळा चालवणाऱ्या शिक्षका स्पेशल (चाईल्ड) एज्युकेटर यांनी दिली. त्यामुळे स्वमग्रता ही नैसर्गिक नसून ती मानवी चुकांमुळेही होऊ शकते ही धोक्याची घंटा समजून पालकांनी सावध राहवे

व्हर्च्यूअल ऑटीझम कडे झुकणाऱ्या मुलांची लक्षणे : सामान्य मुलांचे बोलणे अचानक बंद होणे, जे मुल खेळत-बागडत आनंदी असते ते एकाच ठिकाणी बसून शांत होणे समवयस्क मुलांमध्ये मिसळणे टाळणे मोबाईल हातातून काढताच हायपर होऊंन किंचाळणे, रडणे, मारणे मोबाईल पाहताना तो काढून घेतल्यास वस्तु फेकणे, डोके आपटून घेणे

असे आहेत उपाय : पालकांनी आधी स्वतःला मोबाईल व्यसनापासून दूर ठेवावे. मुल अनुकरणशील असतात. ते पालकांचेच अनुकरण करतात मुलांसोबत पुरसे संवाद साधा. त्यांना अभिव्यक्त होण्यास अवकाश, वाव द्यावा पालकांनी मुलांसोबत खेळणे, मैदानात, बागेत नेणे, शारीरिक कसरत होईल असे खेळ. निसर्गाच्या सान्निध्यात बागडू देणे, पाणी, मातीशी खेळणे. झाडावर चढणे आदी उपक्रम मुलांच्या कलांना वाव द्यावा, चित्र रंगवण्यासाठी चित्रपुस्तके, गोष्टींची पुस्तके आणून द्यावीत मुलांचे मोबाईल व्यसन हळूहळू कमी करणे. बालनाट्य चळवळीला गती द्यावी. चित्रे पाहून मुलांना गोष्टी, शिल्प, कला निर्मिती शिकवावी. महत्वाचे पालकांनी मोबाईलचे व्यसन पूर्णपणे कमी करणे.न्यूक्लिअर कुटुंबे, व्यग्र पालक, यामुळे मुलांना मोबाईलचे व्यसन जडते. त्यातून व्हर्च्यूअल ऑटीझम ही मानवनिर्मित स्वमन्नेता मुलांमध्ये वाढत आहे. कोविड नंतर अशा मुलांची संख्या वाढली असून त्यांना पुन्हा नॉर्मल करणे मोठे आव्हान असते. त्यामुळे पालकांनी स्वतः मोबाईल व्यसनापासून दूर राहून मुलांशी संवाद वाढवावा असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## संस्कृती विद्यालय येथे दंतरोग तपासणी शिबिर



बीड। प्रतिनिधी

येथील शिक्षण तीर्थ संस्कृती विद्यालय म्हसोबा फाटा नगर रोड बीड येथे दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी शाळेतील मुलांसाठी हे दंत रोग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे संस्थापक डॉ. दत्ता नलावडे यांनी उपस्थित डॉक्टरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यानंतर प्रत्यक्ष मुलांच्या दंत तपासणीला सुरुवात झाली. यावेळी मुलांना किरकोळ औषध उपचार करण्यात आले एक सामाजिक बांधिलकी म्हणून दरवर्षी आदित्य दंत महाविद्यालयाच्या वतीने दंत रोग तपासणी शिबिर मोफत आयोजित केले जाते. या शाळेतील गोरगरीब आघात निराधार मुलांना त्याचा खूप चांगला फायदा होत आहे. या शिबिराचे प्रमुख डॉ. मंगेश अंधारे यांनी या सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी त्यांच्यासोबत डॉ. प्रतिक घुले, डॉ. अनुष्का सोनवणे डॉक्टर सारिका कापसे डॉ. संयुक्ता पाटील व डॉ. नेहा थापडे या डॉक्टरांनी शाळेतील सर्व मुलांचे दंत रोग तपासणी केले. एकूण तीनशे मुलांची दंतरोग तपासणी कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक गजानन जानवळे, किरण रेडेकर, राम हळणर यांनी परिश्रम घेतले. डॉक्टर दत्ता नलावडे यांनी सर्व डॉक्टरांचे व आदित्य दंत महाविद्यालयाचे आभार व्यक्त केले

# शेतकरी विरोधी कायदे समजावून घेण्यासाठी किसानपुत्रांचे ४ मे रोजी अंबाजोगाईत शिबीर -अमर हबीब यांची माहिती

## फक्त ५० शिबीरार्थींचीच व्यवस्था, दोन सत्रात होणार शिबीर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शेतकरी आत्महत्यासाठी कारणीभूत ठरणारे शेतकरी विरोधी कायदे नेमके कोणते आहेत आणि शेतकरी स्वातंत्र्याची न्यायालयीन लढाई नेमकी कशी सुरु आहे हे समजावून घेण्यासाठी अंबाजोगाई येथे ४ में रोजी एक किसानपुत्राचे दिवसीय शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबीरात फक्त ५० शिबीरार्थींना प्रवेश देण्यात येणार असून या शिबीरात सहभागी होण्यासाठी किसानपुत्रांनी अगाऊ नांव नोंदणी करावी, असे आवाहन संयोजक सुदर्शन रापतवार आणि अनिकेत डिघोळकर यांनी केले आहे.**

राज्यातीलच नव्हे तर देशभरातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण कमी व्हायला पाहिजे यासाठी किसानपुत्र आंदोलन गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. शेतकरी विरोधातील जाचक कायदे रद्द केल्यानंतर शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी होईल, असा दावा किसानपुत्र आंदोलन मागील काही वर्षांपासून सातत्याने करते आहे. हे शेतकरी विरोधी कायदे नेमके कोणते आहेत व ते रद्द करण्यासाठी किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने सुरु करण्यात आलेली न्यायालयीन लढाई नेमकी कुठपर्यंत पोहोचली आहे, याची सामान्य शेतकरी, शेतकरी चळवळीत



काम करणाऱ्या लहानमोठ्या कार्यकर्त्यांना माहीत व्हावे, यासाठी किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने राज्यभर किसानपुत्राच्या शिबीराचे आयोजन करणार आहे. याचाच एक भाग म्हणून येत्या ४ में रोजी अंबाजोगाई येथे एक दिवसीय किसानपुत्राचे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ९:३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे शिबीर चालणार आहे. मोजक्या ५० किसानपुत्रांना या शिबीराचे सहभागी होता येणार आहे. या कालावधीत शिबीरार्थींना दोन वेळेस चहा व दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. या शिबीरातील पहिले सत्र सकाळी ९:३० वाजता सुरू होणार असून ''शेतकरी विरोधी कायदे'' या विषयावर मुख्य मार्गदर्शक अमर हबीब हे मार्गदर्शन करणार आहेत. यानंतर सकाळी ११:३० ते १२:३० या कालावधीत होणार असून या सत्रात ''शेतकऱ्यांची न्यायालयीन लढाई'' या विषयावर अमृत महाजन हे माहिती देतील. दुपारी १२:३० ते १:०० या कालावधीत जेवण होणार असून दुपारी दुसरे सत्र १ वाजता सुरू होणार आहे. दुपारी १ ते ३ या कालावधीत ''सर्जकांचे स्वातंत्र्य'' या विषयावर अमर हबीब हे सर्जकांच्या स्वातंत्र्याविषयी बोलणार आहेत. तर ३ ते ४:३० या कालावधीत शिबीरार्थींची मनोगते, प्रश्नोत्तराचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी ५ वाजता प्रमाणपत्र वाटपाने शिबीराची सांगता होणार आहे. हे शिबीर फक्त ५० किसानपुत्रां साठीच असणार असून १ ते ५० अनुक्रमानुसार नांव नोंदणी सुरु करण्यात आली आहे. १५ किसानपुत्रांनी आपली नांवे नोंदवली आहेत. उर्वरित किसानपुत्रांनी आपले नांवे त्वरीत नोंदवावीत असे आवाहन संयोजक सुदर्शन रापतवार आणि अनिकेत डिघोळकर यांनी केले आहे.

# मतिमंद मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमास २० वर्षांची सक्तमजुरी

## सरकारी वकील ॲड. लक्ष्मण फड यांचा युक्तिवाद ठरला प्रभावी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**मतिमंद मुलीवर वारंवार बलात्कार करून गर्भवती करणाऱ्या आरोपी गोविंद मुंजाबा रूद्रे यास जिल्हा व सत्र न्यायाधीश संजश्री घरत यांनी २० वर्षांची सक्त मजुरी व ३० हजार रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.**

वानटाकळी (ता. परळी) येथे नातेवाईकांकडे राहण्यासाठी आलेल्या आरोपीने मतिमंद पीडित मुलीचा शारीरिक व मानसिक गैरफायदा घेत अनेक वेळा बलात्कार केला. पीडिता गर्भवती राहिल्यानंतर प्रकार उघडकीस आला. २० जून २०२१ रोजी अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास अधिकारी एन.पी. पवार यांच्या सखोल तपासानंतर आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. न्यायालयासमोर सरकार पक्षातर्फे ॲड. लक्ष्मण फड यांनी युक्तीवाद केला की, प्रकरणात आरोपी हा तिच्या गर्भातील अपत्याचा बाप होता. तसेच पिडीत मुलगी ही तिच्यासोबत काय घटना घडत आहे व त्या घटनेचे काय परीणाम होतील, हे कळणे इतपत तिची बौद्धीक क्षमता नव्हती. ही बाब सरकार पक्षाने सिद्ध केली. त्यामुळे प्रकरणात आरोपीने पिडीतेच्या बौद्धीक व्यंगाचा गैरफायदा घेवुन पिडीतेवर वारंवार अतिप्रसंग केले. ही बाब सरकार पक्षाने सिद्ध केली. याकामी डीएनए अहवाल व मनोविकार तज्ज्ञ डॉ. कृष्णा कदम यांची साक्ष महत्त्वाची ठरली. पीडितेची बौद्धिक क्षमता कमी असल्याचे न्यायालयात सिद्ध झाले. न्यायालयाने कलम ३७६ (२)(एल) व ३७६ (२)(एन) अन्वये आरोपीस शिक्षा ठोठावत एकत्रितपणे २० वर्षांची सक्त मजुरी आणि ३० हजार रूपये दंड ठोठावला. तसेच दंडाची रक्कम पीडित मुलीस देण्याचे आदेशही देण्यात आले. याप्रकरणात सरकार पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. लक्ष्मण फड यांनी काम पाहिले तर पैरवी म्हणुन एएसआय गोविंद कदम यांनी त्यांना मदत केली. न्यायालयाच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# मोरेवाडी येथे वाचमनची शिक्षकास काटीने मारहाण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**माझ्या मुलाला का रागावले या कारणावरून एका वाचमनने तो वाचमनकी करीत असलेल्या अपार्टमेंन्ट मध्ये राहणाऱ्या शिक्षकास काटीने मारहाण केल्याची घटना नवीन मोरेवाडी भागात असलेल्या जयभिमनगर येथील वरद अपार्टमेंन्ट मध्ये शनिवारी (दि. ०५) दुपारी अडीच वाजण्यास दरम्यान घडली. या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.**

नवीन मोरेवाडी जयभिमनगर येथील वरद अपार्टमेंन्ट या ठिकाणी धम्मानंद नारायण जगताप हा मागील अनेक वर्षो पासून वाचमन म्हणून काम करीत आहे. याच अपार्टमेंन्ट मध्ये राहणारे शिक्षक विष्णू फकीरा कसबे (वय ४७) यांना वाचमन धम्मानंद जगताप यांने माझ्या मुलाला का रागावले असे विचारले. यामुळे त्या दोघात शाब्दीक बाचाबाची झाली. यावेळी धम्मानंद यांने काटीने कसबे यांना मारहाण करुन शिवीगाळ केली. या प्रकरणी शिक्षक विष्णू कसबे यांच्या फिर्यादीवरुन वाचमन धम्मानंद नारायण जगताप याच्या विरुद्ध अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात गुरनं १५१/२०२५ नुसार गुन्हा दाखल झाला आहे.

# गेवराईत जिल्हा वाहतुक शाखेची नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई

बीड । प्रतिनिधी

जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनखाली आज जिल्हा वाहतुक शाखेने गेवराई येथे नियम मोडणार्या वाहनधारकांवर कारवाई केली यावेळी ९३ केसेस आणि ६५ हजार रुपयांचा दंड वाहनधारकांना ठोठावला तसेच रोख ८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की, बीड जिल्ह्यात पोलीस अधिक्षक नवनीत सर यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरु आहेत तसेच सरकारी नियमांचे पालन करण्यासाठी देखील नियम मोडणार्या वाहनधारकांवर जरब बसावा या करिता कार्यवाही सुरु आहे आज जिल्हा वाहतुक



शाखेने मोटार वाहन कायद्या अंतर्गत गेवराई येथील शिवाजी चौक, बस स्टॅन्ड परिसर येथे जिल्हा वाहतुक शाखा आणि गेवराई वाहतुक शाखा ही जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय,गेवराई पोस्टचे पोलीस निरीक्षक प्रविण, पोलीस हवालदार शांतीलाल, ◀◀ पान ३ वर

## संजय गांधी व श्रावण बाळ योजनेचे आज बालाजी मंदिरात डीबीटी शिबिर

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील जुना मोंढा भागातील बालाजी मंदिर येथे श्रावण बाळ व संजय गांधी निराधार योजनेतील ज्या लाभार्थ्यांचे डीबीटी झालेले नाही अशा लाभार्थ्यांसाठी आज दिनांक ९ मार्च रोजी सकाळी दहा ते दुपारी चार या वेळेत शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती माजी नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी दिली.

या शिबिरामध्ये ज्यांची अद्याप डीबीटी झालेली नाही असे लाभार्थी, जे वयोवृद्ध लाभार्थी तहसीलमध्ये जाऊ शकत नाहीत असे लाभार्थी, यांची पगार बंद झालेली आहे खात्यावर पडत नाही असे लाभार्थी, ज्यांचा अंगठा स्पष्टपणे उमटत नाही असे लाभार्थी अशा सर्व लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन माजी नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेटला झिरो नेट एन.पी.ए.सह १४ कोटी नफा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री मंगलनाथ मल्टिस्टेटला मार्च २०२५ अखेर १४ कोटी नफा प्राप्त झाला असून नेट एन.पी.ए.झिरो करण्यात यश प्राप्त झाले आहे संस्थेला २५ वर्षे सभासदांच्या सेवेत पूर्ण झाली आहेत संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सभासद,हितचिंतक,नागरिक यांच्या विश्वासास सदैव पात्र राहुन घवघवीत यश संपादन करत १४ शाखांच्या माध्यमातून ५०२ कोटीचा व्यवसाय यशस्वी पूर्ण केला आहे.संस्थेने गेली २५ वर्षात सभासदांच्या अपेक्षा जाणून कार्य केले आहे त्यामुळे सभासदांचा बहुमूल्य प्रतिसाद प्राप्त करून गेली २५ वर्ष संस्था अविरत अखंड कार्य करत आहे. संस्थेने ग्रामीण भागापासून







ते शहरी भागात शाखांचा विस्तार केलेला असून सर्व शाखा या नफ्यात आहेत. मराठवाड्यातील सर्वात जास्त सोने तारण कर्ज वाटप करणारी एकमेव संस्था म्हणून संस्थेचे नाव लौकिक आहे संस्थेची प्रतिमा कायम ठेवून संस्थेने आखलेल्या १००० कोटी व्यवसाय पूर्ततेच्या अनुषंगाने काम करत येणाऱ्या काळात अल्प व्याजदरात जास्तीजास्त सोनेतारण कर्ज वाटप करून सभासदांच्या ठेवीना अधिकाधिक सुरक्षा देण्याचा मूळ उद्दिष्ट संस्थेचा आहे. संस्थेचे अध्यक्ष आर.जी.कानडे यांनी या यशाबद्दल माध्यमांशी बोलताना सांगितले कि,संस्थेने केवळ व्यवसाय वाढीस व नफा वाढीस प्राधान्य न देता विश्वासाहर्ते बरोबर पारदर्शक व्यवहारास प्राधान्य देऊन संस्थेच्या सभासदांच्या ठेवीना सुरक्षा निर्मिती करीता अल्प व्याजदरात सुरक्षित कर्ज वाटपास नेहमीच प्राधान्य दिले आहे. संस्थेचे मार्च २०२५ अखेर संस्थेच्या ३०० कोटी ठेवी व एकूण २०२ कोटी कर्ज वाटप आहे त्यामध्ये सुरक्षित सोनेतारण कर्ज,वेअरहाऊस कर्ज,मुदत ठेव कर्ज अधिकाधिक वाटप केले असून एकूण कर्ज वाटपाच्या ९९.२४ टक्के कर्ज हे सुरक्षित आहे त्यामुळे निश्चितच सुरक्षित कर्ज वाटपाच्या माध्यमातून सभासदांच्या ठेवीना सुरक्षा कवच निर्माण केले आहे. तसेच संस्थेने कर्ज वसुलीत देखील यश संपादन करून नेट एन.पी.ए.झिरो केला आहे संस्थेची ◀◀ पान ३ वर

# मराठी पत्रकार परिषद हीच आपली ओळख- एस. एम. देशमुख

बीड । प्रतिनिधी

ऐंशी वर्षाचा इतिहास असलेली मराठी पत्रकार परिषद हीच आपली ओळख असून या परिषदेला मोठा इतिहास आहे. पत्रकारांच्या प्रश्नांबरोबरच समाजाच्या प्रश्नाकडेही या परिषदेने कायम लक्ष दिलेले आहे. यापुढेही पत्रकारांचे प्रश्न सोडवण्याबरोबरच सामाजिक प्रश्नावरही मराठी पत्रकार परिषद आंदोलन करेल अशी ग्वाही मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहावर बीड जिल्हा नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या सत्कार प्रसंगी बोलताना दिली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अप्रतिम मीडियाचे प्रमुख तथा दैनिक सामनाचे माजी संभाजीनगर आवृत्तीचे संपादक अनिल फळे, दैनिक सुराज्यचे संपादक सर्वोत्तम गावरस्कर ,डिजिटल मीडियाचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांची प्रमुख उपस्थित होती.

यावेळी जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, विभागीय



## बीडमध्ये जिल्हा पदाधिकाऱ्यांचा सत्कार संपन्न

सचिव रवी उबाळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पुढे बोलताना एस.एम. देशमुख म्हणाले की पत्रकारांचे अनेक प्रश्न आहेत. ते सोडवण्याबरोबरच जिल्ह्याची प्रतिमा सुधारण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. बीड मधील वाईट गोष्टी शिवाय बीडमध्ये खूप चांगल्या गोष्टी आहेत. हे ही पत्रकारांनी पुणे, मुंबईच्या पत्रकारांच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे. या जिल्ह्यात अनेक खेळाडू राष्ट्र पातळीवर गाजलेले आहेत. अनेक तरुण तरुणी देश पातळीवर कामगिरी करतात. मात्र त्यांची चर्चा होताना दिसत नाही. अशी खंतही त्यांनी बोलून दाखवली. आपल्याला जाणीवपूर्वक जिल्ह्याची प्रतिमा सुधारावी लागेल असे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. अनिल फळे यांनी आपली भूमिका मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके यांनी केले. तर आभार प्रदर्शन संभाजीनगर विभागाचे सचिव रवी उबाळे यांनी केले .या बैठकीला राज्य कार्यकारिणी ◀◀ पान ३ वर

# येरमाळ्याच्या येडेश्वरी देवीचा चैत्र पौर्णिमा यात्रा महोत्सव होणार शनिवारपासून सुरू

**कळंब । प्रवीण तांबडे**

येरमाळा येथील आराध्य दैवत आई येडेश्वरी देवीचा चैत्र पौर्णिमा यात्रा उत्सव १२ ते १७ एप्रिल दरम्यान होत आहे. चुना वेचण्यासाठी मुख्य कार्यक्रम रविवार (ता. १३) होणार आहे . देवस्थान ट्रस्ट व ग्राम पंचायतीने कार्यक्रम पत्रिका प्रकाशित केले असून मंदिर देवस्थान ट्रस्ट कडून यात्रा पूर्व तयारी कामे जोमात सुरू आहे. तुळजाभवानी मातेची धाकटी बहीण येडेश्वरी देवीची ओळख आहे .राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा यात्रोत्सव म्हणून येरमाळा राज्यात परिचित आहे . अनेक खेडेगावातील तसेच तालुक्यातील, जिल्ह्यातील व बाहेर राज्यातील लोक चुनावसण्यासाठी खास करून येतात. देवीच्या मंदिरात शनिवारी तारीख १२ महापूजा रात्री दहा वाजता छबिना होणार आहे. १३ एप्रिल ला सकाळी आठ वाजता देवीची पालखी आमराई मंदिराकडे प्रस्थान होईल. देवीची पालखी चे वाजत गाजत चुन्या च्या रानात आगमन झाल्यानंतर सकाळी दहा वाजता चुना वेचण्याचा कार्यक्रम होईल . चुन्याच्या रानात देवीची पालखी आमराई मंदिरापुढे छत्र पौर्णिमा यात्रेसाठी पाच दिवस पालखीचा मुक्काम असेल. सोमवारी १४ एप्रिल ला पशुप्रदर्शन तर मंगळवारी १५ एप्रिलला दुपारी चार वाजता कुस्त्यांची स्पर्धा रात्री नऊला आराधी गायनाचा आराधी मेळा कार्यक्रम होणार आहे. बुधवारी १६ एप्रिलला रात्री नऊ वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिरातून शोभेची दारूची मिरवणूक निघून आमराई मंदिर परिसरात आताच बाजी चा कार्यक्रम होणार आहे.





## चुना वेचण्याचा कार्यक्रम रविवार १३ एप्रिलला

१७ एप्रिलला दुपारी चार ला पालखीच्या महापूजेनंतर गुगरी महाप्रसाद ची वाटप झालेले नंतर डोंगरावरील श्री येडेश्वरी देवीचे मुख्यमंत्र्याकडे पालखीची वाजत गाजत प्रयाण होणार आहे.

देवस्थान ट्रस्ट कडून यात्रेची तयारी शनिवारी १२ तारखेपासून श्रीदेवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेला सुरुवात होणार असून देवस्थान ट्रस्ट कडून भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर परिसर सभा मंडप, दर्शन रांग ,डोंगर भवतीचा फेटा मार्ग ,आमराई मंदिर परिसरातील घुगरी महाप्रसाद वाटप कट्टा साफसफाई चे कामे सुरू आहेत.

# अंबाजोगाईतील सकलेश्वर मंदिर राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित

## आ.नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश; मंदिराचे जतन आणि संवर्धन होणार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाने अंबाजोगाई येथील ऐतिहासिक आणि प्राचीन सकलेश्वर महादेव मंदिर (बाराखांबी मंदिर) हे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे या ऐतिहासिक मंदिराच्या संवर्धन आणि संरक्षणास चालना मिळणार असून पर्यटनासही चालना मिळणार आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी सकलेश्वर मंदिरास संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळविण्यासाठी सातत्याने राज्य शासनाकडे पाठपुरवा केला होता. त्यांच्या मागणीला सकारत्मक प्रतिसाद देत राज्य शासनाने या संदर्भातील अधिसूचना जारी केली आहे.**

अंबाजोगाई येथील सकलेश्वर मंदिर १२व्या शतकातील यादवकालीन स्थापत्यशैलीचे उत्तम उदाहरण मानले जाते. या मंदिराच्या परिसरात इतर पाच मंदिरांचे पुरावशेष व जवळपास ११८ प्राचीन शिल्पावशेष आढळले आहेत. तसेच, मंदिराच्या सभोवताली मजबूत बारा खांब असल्यामुळे त्याला 'बाराखांबी मंदिर' असेही संबोधले जाते. हे मंदिर अद्वितीय असून आपल्या स्वरूपातील मराठवाड्यातील एकमेव असे मंदिर



असल्याचे राज्य शासनाने नमूद केले आहे. या मंदिराला ऐतिहासिक, स्थापत्य, धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या मोठे महत्त्व आहे. येथे मोठ्या संख्येने भाविक भगवान शंकराच्या दर्शनासाठी येतात. शिवरात्री, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे जिल्ह्यातील नागरिकांनो परिसरातील अवैध धंद्यांची तक्रार आता घरबसल्या नोंदवा; पोलिसांनी जारी केला व्हॉट्सप क्रमांक, नाव राहणार गुप्त

**पुणे प्रतिनिधी**

आजच्या डिजिटल युगात मकोबाइल हा प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. याच तंत्रज्ञानाचा वापर करत पुणे ग्रामीण पोलिसांनी अवैध व्यवसायांवर अंकुश लावण्यासाठी एक नाविन्यपूर्ण पाऊल उचलले आहे. नागरिकांना आता पोलीस ठाण्यात न जाता, घरबसल्या व्हॉट्सपद्वारे तक्रार नोंदवता येणार आहे. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांच्या संकल्पनेतून 'व्हॉट्सप दक्ष प्रणाली' सुरू करण्यात आली असून, यासाठी ९९२२८९२१०० हा खास व्हॉट्सप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे.





अनेक जागरूक नागरिकांना आपल्या परिसरातील अवैध धंदे – मग ते जुगार, दारूविक्री असो की अन्य बेकायदा व्यवसाय – याबाबत तक्रार करायची इच्छा असते. मात्र, पोलीस ठाण्यात जाण्यासाठी वेळेची कमतरता किंवा भीती यामुळे ते मागे हटतात. ही अडचण लक्षात घेऊन पुणे ग्रामीण पोलिसांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. आता कोणत्याही नागरिकाला अवैध धंद्यांची माहिती, फोटो किंवा व्हिडिओ थेट व्हॉट्सपवर पाठवून तक्रार नोंदवता येईल. या सुविधेमुळे तक्रार करणे सुलभ आणि सुरक्षित होणार आहे.

'व्हॉट्सप दक्ष प्रणाली' अंतर्गत नागरिकांनी ९९२२८९२१०० या क्रमांकावर अवैध धंद्यांबाबत माहिती पाठवायची आहे. तक्रारीची गोपनीयता राखली जाईल आणि तात्काळ कारवाईसाठी ती संबंधित पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचवली जाईल. यामुळे अवैध व्यवसायांवर त्वरित आळा घालणे शक्य होईल, अशी अपेक्षा पोलिसांना आहे. पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी सांगितले, नागरिकांचा सहभाग हा गुन्हेगारी रोखण्यासाठी महत्त्वाचा आहे. या प्रणालीमुळे लोकांना पोलिसांशी थेट जोडले जाणे सोपे होईल आणि समाजात सुरक्षितता वाढेल.

नागरिकांना आवाहन

पुणे ग्रामीण पोलिसांनी नागरिकांना या उपक्रमात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. तुमच्या आजूबाजूला काहीही बेकायदा सुरू असेल, तर घाबरू नका. फक्त व्हॉट्सपवर माहिती पाठवा, बाकी जबाबदारी आमची, असे पोलिसांनी म्हटले आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील अवैध धंद्यांवर नजर ठेवणे आणि त्यांना आळा घालणे सोपे होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

हा उपक्रम पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्मार्ट पोलिसिंग धोरणाचा एक भाग आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नागरिक आणि पोलिस यांच्यातील दरी कमी करणे आणि कायदा-सुव्यवस्था राखणे हे यामागील उद्दिष्ट आहे. या प्रणालीच्या यशस्वीतेसाठी नागरिकांचा प्रतिसाद महत्त्वाचा ठरणार असून, यामुळे पुणे ग्रामीण भागात गुन्हेगारीला चाप बसेल, अशी आशा आहे.

# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस आयएसओ मानांकन

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला जागतिक स्तरावरील गुणवत्ता व्यवस्थापन आणि उत्कृष्ट कार्यप्रणालीबाबतचे आयएसओ मानांकन मिळाले आहे. यापूर्वीही २०१२ साली बँकेला पहिल्यांदा आयएसओ मानांकन मिळाले होते. त्याचबरोबर २०१९ साली ही आयएसओ मिळाले होते, आता हे सुधारीत मानांकन प्रमाणपत्र बँकेने अद्ययावत केले असल्याचे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई यांनी सांगितले.



मानांकन प्राप्त झाले त्याप्रसंगी बँकेचे संचालक आणि क्रीडा युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, बँकेचे अध्यक्ष प्रा.डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, माजी आमदार रमेश थोरात, रेवणनाथ दारवटकर, भालचंद्र जगताप, रणजित तावरे, प्रविण शिंदे, दत्तात्रय येळे, संभाजी होळकर, निर्मला जागडे, पुजा बुट्टेपाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई, सरव्यवस्थापक संजय शितोळे तसेच बीएसआय ग्रुप ऑफ इंडियाचे महेश मालपाठक आदी उपस्थित होते.

दुर्गाडे म्हणाले, 'बदलत्या काळामध्ये वित्तीय प्रणाली, नवी तंत्रज्ञान आणि ग्राहकांच्या अपेक्षा या बाबीनुसार बँकिंग व सहकार क्षेत्रामध्ये आमूलाग्र असे बदल घडून आलेले आहेत. तसेच या क्षेत्रांमध्ये प्रचंड स्पर्धा ही वाढलेली आहे. २१ व्या शतकातील समृध्द सुदृढ, सक्षम व अग्रगण्य संस्था म्हणून आपले स्थान कायम राखण्यासाठी जिल्हा बँक कार्यरत आहे.

सहकार क्षेत्र हे आर्थिक सेवेचे साधन असून समाजातील तळगाळातील लोकांना आर्थिक दृष्ट्या अधिक समृद्ध आणि सशक्त करण्याचे साधन आहे. जिल्हा बँक अल्प, अत्यल्प भूधारक घटकांना, बचत गटातील महिलांना विचारात घेऊन त्यांची सर्वांगिण उन्नती करण्यासाठी कटिबद्ध आहे. आयएसओ मानांकनाचा बँकेस भावी काळात निश्चितच फायदा होईल.'

# पुणे विमानतळाच्या धावपट्टी विस्ताराचे काम 'फास्ट ट्रॅक'वर–केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे विमानतळावर आंतरराष्ट्रीय उड्डाणे वाढावीत आणि मोठ्या विमानांना उतरण्याची सोय व्हावी, यासाठी धावपट्टी विस्तारीकरणाच्या कामाला आता वेग येणार आहे. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी हे काम 'फास्टट्रॅक'वर करण्याचे निर्देश दिले आहेत. यासंदर्भात त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन भूसंपादन, पर्यायी रस्ता आणि तांत्रिक बाबींचा आढावा घेतला. लोहगावकडे जाणाऱ्या रस्त्याचा प्रश्नही सुटला असून, पुणे महापालिका हवाई दलाशी समन्वय ठेवून हा रस्ता तयार करणार आहे. नुकतीच धावपट्टी विस्तारीकरणाला मंजुरी मिळाल्यानंतर केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, विमानतळ संचालक संतोष ढोके, हवाई दलाचे अधिकारी, महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांच्यासह बैठकीत चर्चा केली. या कामाला गती देण्यासाठी सर्व यंत्रणांना सुस्पष्ट सूचना देण्यात आल्या.



मोहोळ म्हणाले, धावपट्टी विस्तारीकरणासाठी सैन्य आणि खासगी जागेची गरज यावर चर्चा झाली. हवाई दलाची जागा विमानतळ प्राधिकरणाला मिळावी, यासाठी प्रस्ताव सैन्य मुख्यालयाकडे पाठवला जाईल. या बदल्यात प्राधिकरण हवाई दलाला पर्यायी जागा आणि आस्थापनेचा खर्च देईल. विश्रांतवाडी ते लोहगाव रस्ता बाधित होणार असल्याने हवाई दलाच्या जागेतून पर्यायी रस्ता होईल, ज्याचा खर्च महापालिका करेल. हे काम वेगाने पूर्ण होईल.

मोहोळ म्हणाले, पुणे विमानतळाची गरज लक्षात घेता धावपट्टी विस्तारीकरण तातडीने आणि वेगाने होणे गरजेचे आहे. पुरंदर विमानतळाची प्रक्रिया सुरू असली तरी पुण्याची तात्काळ गरज पूर्ण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय उड्डाणे वाढवणे महत्त्वाचे आहे. भूसंपादन राज्य सरकारकडून वेगाने होईल, पण त्यासाठीची तयारीही वेळेत पूर्ण करावी लागेल.

# श्री छत्रपतीच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्यास सुरुवात

**भवानीनगर । प्रतिनिधी**

श्री छत्रपती कारखान्याच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. अनेक इच्छुकांनी अर्ज भरण्याच्या पहिल्याच दिवशी अर्ज दाखल केले.

श्री छत्रपती कारखान्याच्या निवडणुकीसाठी सोमवार (दि. ७) पासून १५ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पहिल्या दिवसापासूनच अर्ज दाखल होऊ लागले आहेत. अनेक सभासदांमध्ये करखान्याच्या निवडणुकीविषयी उत्सुकता निर्माण झाली असल्याचे दिसत आहे. श्री छत्रपती कारखान्यामधून सुमारे ३०० सभासदांनी आतापर्यंत बाकी नसल्याचे दाखले घेतले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे.



कारखान्याची निवडणूक पाच वर्षांनी लांबल्याने अनेक इच्छुकांचे कारखान्याच्या निवडणुकीकडे लक्ष होते. कारखान्याची निवडणूक जाहीर होत आहे हे लक्षात आल्यानंतर मागील आठ दिवसापासूनच अनेक इच्छुकांनी कारखान्यामधून बाकी नसल्याचे दाखले घेण्यास सुरुवात केली होती.

या निवडणुकीमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे व साखर संघाचे माजी अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांचा एक पॅनेल उभा राहत असून १९९२ नंतर जिजामाता पॅनेल पुन्हा उभा करण्यासाठी सुनील काळे यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामुळे सुनील काळे यांचा एक पॅनेल या निवडणुकीत उभा राहत आहे. याबरोबरच भारतीय जनता पार्टीचे तानाजीराव थोरात यांनीदेखील पॅनेल उभा करण्यासाठी हालचाली सुरू केलेल्या आहेत. त्यामुळे त्यांचादेखील एक पॅनेल उभा राहण्याची शक्यता आहे. सुनील काळे यांच्या पॅनेलमधून उमेदवारी मिळवण्यासाठी अनेक इच्छुक उमेदवार प्रयत्न करीत आहेत. शेतकरी संघटना, राष्ट्रीय समाज पार्टी आदी पक्षांचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. इच्छुकांची संख्या मोठी असल्यामुळे श्री छत्रपती कारखान्याची निवडणूक तिरंगी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# शिरूर बसस्थानकातील समस्यांवर तातडीने उपाययोजना न झाल्यास आंदोलन; भाजपा महिला आघाडीचा इशारा

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर बसस्थानकातील विविध समस्यांमुळे प्रवासी, वृद्ध, महिला आणि विद्यार्थ्यांचे हाल होत असून, यावर तातडीने उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा भाजपा महिला आघाडीच्या शहराध्यक्षा प्रिया बिरादार यांनी आगार व्यवस्थापकांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. यावेळी भाजप अल्पसंख्याक महिला आघाडीच्या शहराध्यक्षा कोमल भगवे, उपाध्यक्षा सृष्टी करंजुले, ओबीसी शहराध्यक्षा सुशीला गोसावी, नितु शर्मा, सुषमा फंड, राजेंद्र महाजन, प्रितेश फुलडाळे उपस्थित होते.



उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची सोय नाही, पाणपोई असूनही पाणी नाही, फलाटावर बस वेळेवर लागत नाहीत, बस वारंवार बंद पडतात, अचानक रद्द होतात, स्वच्छतागृहात अस्वच्छता आणि पैसे मागितले जातात, रस्त्यावर खड्डे आणि नादुरुस्त बस उभ्या आहेत, महिलांच्या सुरक्षेसाठी एकच होमगार्ड असून दोन पोलिसांची गरज आहे, अशा समस्या आहेत. या गैरसोयी दूर कराव्यात, अन्यथा आंदोलन करू, असे निवेदनात म्हटले आहे.

भाजपा महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी आगार व्यवस्थापक मनिषा गायकवाड आणि बसस्थानक प्रमुख भैरवनाथ दळवी यांच्यासह परिसराची पाहणी करून समस्या दाखवल्या आणि निवेदन सादर केले.

# पुण्यात हनुमान जन्मोत्सवानिमित्त 'सुंदरकांड महापर्व'चा भक्तिमय सोहळा

**पुणे । प्रतिनिधी**

जॉयफुल सुंदरकांड ग्रुप आणि आर्ट ऑफ लिव्हिंग वैदिक धर्म संस्था महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमान जन्मोत्सवानिमित्त 'सामूहिक सुंदरकांड महापर्व' आयोजित करण्यात आले आहे. हा भव्य सोहळा १२ एप्रिल रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत श्री वर्धमान सांस्कृतिक भवन, गंगाधाम चौक, पुणे येथे होणार आहे. सर्वांसाठी विनामूल्य असलेल्या या कार्यक्रमात ५,००० हून अधिक भाविक २१ लाख वेळा जय श्री राम चा जप करतील.




प्रसिद्ध भजन गायिका मीनू पोद्दार आणि संजय परख यांच्या सुमधुर स्वरात सुंदरकांड पठण होईल, तर ढोलकीवादक गुरुनाथ केदरेकर यांचे वादन होईल. कार्यक्रमानंतर महाआरती आणि महाप्रसाद ठेवण्यात आला आहे. आर्ट ऑफ लिव्हिंगचे स्वामी माधवानंदजी यांची उपस्थिती असणार आहे.

अत्याधुनिक ध्वनिसंस्था आणि सुंदर सजावटीसह हे महापर्व अविस्मरणीय असेल. हनुमान चालीसाचा गजर आणि भक्तिरसाने वातावरण मंगलमय होईल. हे आयोजन ५४ दिवसांच्या आध्यात्मिक यात्रेचा भाग असून, याची सुरुवात दगडूशेठ गणपती मंदिरात झाली. पुण्यात घरोघरी आणि मंदिरांत सुंदरकांड पठण सुरू आहे. भाविकांना या संगीतमय सोहळ्यात कुटुंबासह सहभागी होण्याचे आवाहन आहे.

# विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षांचे अर्ज भरण्यासाठी अंतिम मुदतवाढ

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षांचे अर्ज भरण्यासाठी आणखी दोन दिवसांची अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. अभ्यासक्रमांचे अर्ज भरण्याची मुदत संपली आहे, अशा अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी अर्ज भरण्यासाठी ही अंतिम मुदत दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आता बुधवारी (ता. ९) ते गुरुवारी (ता.१०) दरम्यान या परीक्षांसाठी अर्ज भरता येणार आहे.



विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील उन्हाळी सत्र परीक्षेत अभ्यासक्रमांचे अर्ज भरण्याची मुदत संपली आहे, अशा अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे अर्ज भरण्यासाठी ही मुदतवाढ दिल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी सांगितले आहे.

परीक्षा अर्ज ऑनलाइन भरून घेतानाच प्रक्रियेनंतर ते विद्यापीठाच्या अंतर्गत व संरक्षित प्रणालीद्वारे परीक्षा अधिकारी यांनी तत्काळ कायम करावेत. तसेच, विद्यार्थ्यांनी भरलेले परीक्षा अर्ज स्वीकारून ते कायम करण्याची जबाबदारी गांभीर्याने घेऊन महाविद्यालयांनी कार्यालयीन वेळेत शक्य असल्यास वाढ करावी.

या कालावधीत वीज खंडित होणे आणि इतर समस्या, तसेच सार्वजनिक सुट्ट्या असल्या तरी विद्यार्थीहित आणि परीक्षा वेळापत्रक लक्षात घेऊन कार्यालयीन स्तरावर सर्व पर्यायी उपाययोजना संबंधित महाविद्यालयांनी कराव्यात, अशी सूचनाही डॉ. देसाई यांनी केली आहे.

# थेऊर येथे महिलेने बाळांसह उचलले टोकाचे पाऊल; घटनेत दोन लहान जुळ्या बाळांचा मृत्यू

**उरुळी कांचन । प्रतिनिधी**

एका ३५ वर्षीय महिलेने आपल्या दोन महिन्यांच्या दोन जुळ्या बाळांसह घराच्या छतावर असणाऱ्या पाण्याच्या टाकीत उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला. या घटनेत ग्रामस्थांच्या प्रसंगावधानाने महिला वाचली परंतु, दोन जुळ्या मुलांचा मृत्यू झाला.ही घटना थेऊर येथील दत्तनगर परिसरात मंगळवारी (ता. ८) सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली. प्रतिभा हेमंत मोहिते (वय ३५, रा. दत्तनगर, थेऊर, ता. हवेली ) असे आत्महत्याचा प्रयत्न केलेल्या महिलेचे नाव आहे.

लोणी काळभोर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रतिभा हेमंत मोहिते यांना पाण्यात बुडताना त्यांच्या घरासमोरील पूजा शिवशंकर स्वामी व त्यांचे पती शिवशंकर स्वामी यांनी पाहिले. त्यांनी लगेच प्रतिभा यांचा भाऊ प्रल्हाद लक्ष्मण गोंडे यांना फोनद्वारे कळवले. त्यावर प्रल्हाद गोंडे यांनी लागलीच घराच्या छतावर जाऊन प्रतिभा यांना पाण्याच्या टाकीमधून बाहेर काढले. सदर घटनेबाबत प्रल्हाद गोंडे यांनी पोलिसांशी संपर्क साधून माहिती दिली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे आणि त्यांचे पथक यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. दरम्यान, मोहिते यांचा विवाह होऊन १० वर्ष झाले होते. परंतु त्यांना अपत्य होत नव्हते. त्यानंतर मूल होण्यासाठी त्यांनी एका खासगी रुग्णालयात ट्रीटमेंट सुरु केली. दोन महिन्यांपूर्वी त्या बाळंतपणासाठी थेऊर येथे त्यांच्या माहेरी आल्या. त्यांना दोन जुळी मुले झाली. त्या बाळांचे वजन कमी भरले. त्यामुळे मुले दगावतील याची भीती त्यांना होती तसेच ट्रीटमेंटसाठीचे इंजेक्शन सुरु असल्याने मलाच काही झाले तर मुलांकडे कोण पाहणार यामुळे मोहिते यांनी टोकाचे पाऊल उचलून आत्महत्याचा प्रयत्न केला.

# अकरा मावळ्यांनी बारा तासांत केले सात किल्ले सर

**लोणावळा । प्रतिनिधी**

बारा मावळातील भोर व मावळ येथील ११ मावळ्यांनी एकाच दिवसात बारा तासात सात किल्ल्यांवर चढाई करत एक अनोखा विक्रम केला आहे. या विक्रमाची इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात आली. सदर चढाईमध्ये सहभागी झालेल्या मावळ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला आहे.



महाराष्ट्रातील गड किल्ले हे शिवरायांच्या स्वराज्याचा अनमोल ठेवा आहे. शेकडो वर्ष होऊन गेले तरी हे गड किल्ले आजदेखील शिवरायांच्या आणि त्यांच्या मावळ्यांच्या पराक्रमाची साक्ष देत उभे आहेत. आणि या गडकिल्ल्यांवरती चढाई करण्याची प्रेरणा येथील भटक्यांना देत असतात. शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या गडकिल्ल्यांवरती भेट देणे हे प्रत्येक शिवप्रेमीचे स्वप्न असते. अशाच काही ध्येयवेड्या गडकोटप्रेमी युवकांनी एकत्र येत मावळातील तब्बल सात किल्ल्यांवर यशस्वीपणे चढाई करून बारा तासांमध्ये हा विक्रम १८ जानेवारी रोजी केला होता. यापूर्वी कोणत्याही ट्रेकरच्या ग्रुपने आजपर्यंत हा पराक्रम केलेला नाही, असे या ग्रुपच्या वतीने शेखर नाणेकर यांनी सांगितले होते.

या ग्रुपने आपली सुरुवात सकाळी पाच वाजता राजमाची या किल्ल्याच्या मनरंजन या बालेकिल्ल्यापासून केली. यानंतर श्रीवर्धन हा किल्ला सर केला. यानंतर हा गट राजमाचीपासून खासगी वाहणारे प्रवास करून लोहगड, विसापूरकडे रवाना झाला. या जोडगोळीतील पहिला विसापूर किल्ला या गटाने सर केला. यानंतर लोहगडावर आपली पावले ठेवली. लगेचच गड उतार होऊन मंडळी तिकोना गडाकडे रवाना झाली. तिकोना गड तासाभरात सर करून मावळे तुंग गडाकडे रवाना झाले. आणि तुंग गड तासाभरामध्येच चढाई करून उतरलेदेखील यानंतर आता वेळ होती कोराईगड पार करणे आणि सहा गड पार करणे आणि ते पार करून सातवा कोराईगड चढाई करणे आणि उतरणे हे एक आव्हानच होते, पण या गटाने हे आव्हानदेखील पार करून एका नव्या विक्रमाला गवसणी घातली आहे.

सुनील चंद्रकांत शेडगे, शेखर शांताराम नाणेकर, रुपेश हरिभाऊ कुंभार, राजेंद्र महादेव चौगुले, लतिफ बापू पटेल, मनोज लक्ष्मण जगताप, रामेश्वर खांडेभराड, बबन कदम, राजेंद्र शिंदे, वसंत विठ्ठल कामथे, अनंता भागवत यांनी हे किल्ले बारा तासात सर केले.

# 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना विषयी व्याख्यान

धनकवडी । प्रतिनिधी

केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळून उपयोग नाही, तर स्वातंत्र्यासोबत समता आणि बंधुतेचा विचार समाजात रुजायला हवा आणि या दिशेने भारतीय स्वातंत्र्यलढ्याची वाटचाल व्हायला हवी, यासाठी डॉ आंबेडकरांनी प्रयत्न केले. केवळ दलितांच्याच नव्हे, तर संपूर्ण भारतीयांच्या उत्थानासाठी त्यांनी कार्य केले, असे प्रतिपादन प्रा. सतीश देशपांडे यांनी केले.

दलित स्वयंसेवक संघ, अण्णा भाऊ साठे स्मारक संस्थेतर्फे आयोजित व्याख्यानमालेत ४१७ वे पुष्प 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' या विषयावर प्रा. देशपांडे बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्रोही कवयित्री नकुशात लोखंडे व शाहीर सदाशिव भिसे यांच्या प्रबोधन गीताने झाली. त्यानंतर लेखक बापूसाहेब विरोळे लिखित 'क्रांतिसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथाचे प्रकाशन प्रा. सतीश देशपांडे व संघप्रमुख राजाभाऊ धडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विजय फडके यांच्यातर्फे ग्रंथालयास ना. सी. फडके यांचे ग्रंथ भेट देण्यात आले. अध्यक्षस्थानी दादासाहेब सोनवणे होते. याप्रसंगी ऊर्मिला पवार, राम कांबळे, लक्ष्मणराव लोंढे, कावेरी जाधव, संदेश दिवेकर, डॉ. नारायण डोलारे, संजय केंजळे, जनार्दन वाघमारे, अनंत भिसे उपस्थित होते. प्रस्ताविक सुजित रणदिवे यांनी केले.

प्रा. देशपांडे म्हणाले, 'भारतीय राज्यघटना निर्माण करून डॉ. आंबेडकरांनी सर्व भारतीयांना मुक्तीचा मार्ग दाखवला. आज भारत जो काही टिकून आहे, तो भारतीय संविधानामुळे टिकून आहे. बाबासाहेबांनी भारतीय संविधान हाती देताना संविधान सभेतील समारोपाच्या भाषणातून इशारा दिला होता की, हे संविधान कितीही चांगले असले तरी, याची अंमलबजावणी करणारे हात कसे आहेत, यावर संविधानाचे यश अवलंबून आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांची जपणूक करणे हे आपल्या समोरचे आव्हान आहे.